मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २८० | मंगळवार, २३ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# चित्रपट निर्मितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जबाबदारीने व्हावा : राज्यपालांचे आवाहन

## मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट समारोह राज्यपालांच्या उपस्थितीत संपन्न

**मुंबई :** कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सर्जनशील क्षेत्रासाठी अमर्याद संधी उपलब्ध करून देत असली तरी तिचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि विवेकाने केला गेला पाहिजे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी बोलताना केले. कृत्रिम बुद्धिमत्ता ही परिवर्तन घडवून आणणारी शक्ती आहे. मात्र तिचा वापर करताना चित्रपट निर्माते आणि सर्जकांच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सात दिवसांपासून सुरु असलेला मिफ – २०२६ हा लघुकथा, माहितीपट आणि ॲनिमेशन चित्रपटांचा १९ वा द्विवार्षिक महोत्सवाची सांगता झाली. यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल म्हणाले की, गेल्या काही वर्षांत मिफ हा माहितीपट, लघुकथा आणि ॲनिमेशन चित्रपटांचा प्रतिष्ठित महोत्सव झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (WAVES) परिषदेचे उद्घाटन केले होते. या परिषदेमुळे सर्जनशील अर्थव्यवस्था आणि डिजिटल कथाकथन क्षेत्रात भारताला जागतिक केंद्र बनविण्याच्या देशाच्या आकांक्षेला बळ मिळाले.

यंदाच्या मुंबई चित्रपट महोत्सवामध्ये जगातील ४६ देशांतून १,४५९ चित्रपटांनी सहभाग घेतल्याबद्दल राज्यपालांनी समाधान व्यक्त केले. या महोत्सवात ४२ हून अधिक भारतीय भाषा तसेच ३० आंतरराष्ट्रीय भाषांमधील चित्रपट प्रदर्शित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.माहितीपट समाजातील वास्तवाचे चित्रण करतात, इतिहास जतन करतात, रूढ समजुतींना आव्हान देतात आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देतात. माहितीपट समाजातील विविध घटकांच्या समस्यांना व्यासपीठ देतात आणि भविष्यातील समाज घडविणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधतात, असे त्यांनी सांगितले.




भारताकडे जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या असल्याचे नमूद करून राज्यपालांनी ग्रामीण आणि आदिवासी भागातील तरुण चित्रपट निर्मात्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील अनुभव, परंपरा आणि संघर्ष यांवर आधारित कथा मांडण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. महिला चित्रपट निर्मात्यांचा अधिकाधिक सहभाग वाढावा, जेणेकरून त्यांच्या दृष्टिकोनांमुळे भारतीय कथाकथन अधिक समृद्ध होईल, असे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे चित्रपटनिर्मिती अधिक लोकाभिमुख झाली असून नव्या सर्जनशील संधी उपलब्ध झाल्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मिफ आणि राज्यातील विद्यापीठांमधील माध्यम व मनोरंजन विभाग यांच्यात अधिक सहकार्य व्हावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. अशा सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक चित्रपट प्रवाहांचा परिचय होईल आणि भविष्यातील सर्जनशील प्रतिभेला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते पोलंडच्या 'सिल्व्हर' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठीचा गोल्डन कॉंच पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच इराणच्या 'अंडर द स्नो' या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय विभागातील सर्वोत्कृष्ट लघुकथा चित्रपटासाठीचा सिल्व्हर कॉंच पुरस्कार आणि जर्मनीच्या 'मायाज सॉंग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन चित्रपटासाठीचा सिल्व्हर कॉंच पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय विभागातील सर्वोत्कृष्ट ध्वनी, सर्वोत्कृष्ट संपादक आणि सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आले.

समारोप सोहळ्याला माहिती व प्रसारण मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव प्रभात कुमार, मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व वित्तीय सल्लागार दीपक नारायण, नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश मगदूम, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी तसेच राज्यपालांचे सहसचिव एस. राममूर्ती उपस्थित होते.

## आष्टी तालुक्यात स्मार्ट मीटरला तत्काळ स्थगिती द्या, अन्यथा तीव्र आंदोलन करणार ! मनसेचे कैलास दरेकर

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे** : महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) शेतकरी सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी आष्टी तालुक्यात महावितरणकडून बसवल्या जाणाऱ्या स्मार्ट मीटरविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांवर आणि सामान्य जनतेवर लादले जाणारे हे स्मार्ट मीटर तातडीने स्थगित करावेत, अशी मागणी दरेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे. सरकारने हा निर्णय मागे न घेतल्यास मनसे स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे शेतकऱ्यांची तसेच सर्वसामान्य आर्थिक जनतेची परिस्थिती आधीच बिकट असताना महावितरणकडून स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती केली जात आहे. या मीटरमुळे सर्वसामान्य ग्राहक आणि शेतकऱ्यांचे वीज बिल अव्वाच्या सव्वा येण्याची भीती व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी प्रशासकीय धोरणावर कडक शब्दांत टीका केली आहे सर्वसामान्य जनतेची व शेतकऱ्यांची लूट थांबवा: कैलास दरेकर यांनी म्हटले आहे की, स्मार्ट मीटरच्या नावाखाली गरिबांची आर्थिक लूट केली जात आहे. ती कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही. सामान्य जनतेला विश्वासात न घेता आणि पुरेशी जनजागृती न करता हे मीटर सक्तीने लादले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.स्मार्ट मीटरला तात्काळ स्थगिती द्या: आष्टी तालुक्यातील एकाही भागात किंवा शेती पंपावर सक्तीने स्मार्ट मीटर बसवू नयेत. या प्रक्रियेला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी दरेकर यांनी केली आहे.मनसे स्टाईल आंदोलनाचा इशारा दिला आहे जर प्रशासनाने आणि महावितरणने ही सक्ती थांबवली नाही, तर संपूर्ण आष्टी तालुक्यात मनसे शेतकरी सेनेच्या वतीने रस्त्यावर उतरून 'मस्त' आणि धडक आंदोलन केले जाईल. होणाऱ्या गंभीर परिणामांना सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल.या इशाऱ्यामुळे आष्टी तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले असून, मनसेच्या या भूमिकेला स्थानिकांचा मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे.

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचा भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांसमवेत योगाभ्यास

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्रप्रतिनिधी:**आंतरराष्ट्रीय योग दिनानिचेऔचित्यसाधून राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज महाराष्ट्र लोकभवन मुंबई येथे भारतीय तटरक्षक दलातील अधिकाऱ्यांसह योगसत्रात सहभाग घेतला. यावर्षी लोकभवनातील योग दिवस भारतीय तटरक्षक दलाच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. भारतीय तटरक्षक दल यंदा स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. योगसत्राला तटरक्षक दलाचे अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसेच महाराष्ट्र लोकभवनातील अधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राज्यपालांनी राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांना योगाचा प्रचार - प्रसार करण्याचे तसेच जगासाठी उत्तम योग शिक्षक व प्रशिक्षक घडवण्याचे आवाहन केले. आज योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे असे नमूद करून राज्यपाल म्हणाले की, शतकानुशतके योगाचा अभ्यास केवळ घरांमध्ये, आश्रम आणि योग संस्थांमध्ये केला जात असे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्याचे आवाहन केल्यानंतर आज जगातील 150 हून अधिक देशांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जात आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. सन 1977 झालेल्या स्थापनेपासून राष्ट्रसेवेत कार्यरत असलेल्या व यंदा सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असलेल्या भारतीय तटरक्षक दलाच्या योगदानाचे राज्यपालांनी कौतुक केले. असंख्य यशस्वी मोहिमा आणि दक्षतेमुळे



भारतीय तटरक्षक दल भारताच्या सागरी सुरक्षा व्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनले आहे. विस्तीर्ण समुद्रकिनारा, गजबजलेली बंदरे आणि महत्त्वपूर्ण सागरी हितसंबंध असलेल्या महाराष्ट्राला तटरक्षक दलाच्या कार्याचा मोठा लाभ झाला आहे.

समुद्रातील जीविताचे संरक्षण, मच्छीमार आणि नाविकांची सुरक्षा, बेकायदेशीर कारवायांना प्रतिबंध आणि किनारपट्टीवरील सुरक्षेची जबाबदारी तटरक्षक दलाने प्रभावीपणे पार पाडली आहे," असे राज्यपालांनी सांगितले. तटरक्षक दलाचे अधिकारी आणि जवान कठीण परिस्थितीतही अथक परिश्रम करून भारताचे समुद्र सुरक्षित, संरक्षित आणि समृद्ध ठेवत असल्याचे राज्यपालांनीया वेळी नमूद केले.

आपण राज्यातील 29 विद्यापीठांचे कुलपती आहो याचा उल्लेख करुन राज्यातील विद्यापीठांनी सर्वोत्तम योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवावे व योग या भारताच्या अमूल्य परंपरेचा जागतिक प्रसार करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनयावेळी राज्यपालांनी केले. यावेळी भारतीय तटरक्षक दलाच्या पश्चिम सागरी प्रदेशाचे अतिरिक्त महासंचालक एम. व्ही. पाठक, पीटीएम, टीएम तसेच महानिरीक्षक भीष्म शर्मा, पीटीएम, टीएम यांनी राज्यपालांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. कैवल्यधामचे योग प्रशिक्षक दिलीप दौनेरिया यांनी योग व प्राणायाम सत्राचे मार्गदर्शन केले.

## मोदींच्या १२ वर्षांत भारताचा सर्वांगीण विकास; पंतप्रधान मोदी देशासाठी वरदान – आमदार संजय केळकर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** देशात २०१४ पूर्वी सातत्याने घोटाळे आणि विविध आरोपांनी ग्रासलेले राज्यकर्ते पाहायला मिळत होते. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारताने सर्वच क्षेत्रांत अभूतपूर्व प्रगती साधली आहे. आज जागतिक स्तरावर भारताची ओळख 'विश्वगुरू' म्हणून निर्माण झाली असून भारतीयांना एक नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. वर्षातील ३६५ दिवस एकही दिवस सुट्टी न घेता देशसेवेसाठी अहोरात्र कार्यरत असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताला लाभलेले वरदान आहेत, असे गौरवोद्गार ठाणे विधानसभेचे भाजप आमदार संजय केळकर यांनी खांदा कॉलनी येथे काढले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कार्यकाळाची १२ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या संकल्पनेतून श्रीकृपा हॉलमध्ये शनिवारी सायंकाळी 'विकसित भारत संकल्प संमेलन' आयोजित करण्यात आले होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार संजय केळकर यांनी २०१४ ते २०२६ या कालावधीत भारताने साधलेल्या विकासाचा सविस्तर आढावा घेतला. मोदी सरकारच्या काळात शिक्षण, आरोग्य, कला, क्रीडा, उद्योग, पायाभूत सुविधा तसेच विविध सार्वजनिक उपक्रमांमध्ये देशाने उल्लेखनीय प्रगती केली असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,

पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, सरचिटणीस दीपक बेहेरे, प्रल्हाद केणी, नगरसेवक एकनाथ गायकवाड, मनोज भुजबळ, दशरथ म्हात्रे, नगरसेविका सीताताई पाटील, दर्शना भोईर, राजश्री वावेकर, मोनिका महानवर, प्रीती जॉर्ज, सरस्वती काथारा, विजयश्री पाटील, कुसुम पाटील, प्रियांका कांडपिले, शिवानी घरत, माजी नगरसेविका सारिका भगत, नीता माळी, पदवीधर प्रकोष्ठचे राज्य संघटक धनराज विसपुते यांच्यासह भाजप उत्तर रायगड जिल्ह्याचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आजी-माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे समाज उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवर नागरिकांचा सन्मान. शिक्षण, आरोग्य, सामाजिक, सांस्कृतिक, कलाक्षेत्र, वारकरी संप्रदाय, विविध धार्मिक संस्थांचे पदाधिकारी, तसेच डॉक्टर, वकील आणि पत्रकार अशा विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींना यावेळी निमंत्रित करण्यात आले होते.

भाजपच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या संमेलनाला पनवेलमधील नागरिकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## कु .सायली शिर्केने ॲडव्होकेट पदवी प्राप्त केल्याबद्दल शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षातर्फे करण्यात आला विशेष सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** कु.सायली शिर्केने ॲडव्होकेट पदवी प्राप्त केल्याबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे आज विशेष सत्कार करण्यात आला.

शिवसेनेचे खांदा वसाहत विभागाचे शहर प्रमुख सदानंद शिर्के यांची कन्या कु. सायली सदानंद शिर्के हिने वकिलीचे शिक्षण पूर्ण करून ॲडव्होकेट पदवी प्राप्त केल्याबद्दल आज खांदा-पनवेल शाखेत तिचा सत्कार करण्यात आला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब




ठाकरे) रायगड जिल्हाप्रमुख दीपक निकम यांच्या हस्ते हा सत्कार संपन्न झाला. यावेळी पनवेल शहरप्रमुख प्रवीण जाधव, नवीन पनवेल समन्वयक शिवाजी पालांडे तसेच शाखेतील पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कु. ॲडव्होकेट सायली शिर्के हिचे या यशाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशिर्वाद देण्यात आले.

# बडदेमाचचा विकासाचा वनवास कधी संपणार?; रस्ता व मूलभूत सुविधांसाठी ग्रामस्थांचा आक्रोश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : सचिन पवार** : रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्याच्या निजामपूर विभागातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या बडदेमाच गावातील नागरिक आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे वास्तव समोर आले आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके उलटून गेली, विविध सरकारे आली-गेली, लोकप्रतिनिधी बदलले; मात्र बडदेमाच गावाच्या विकासाचा प्रश्न अद्याप कायम असल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था असून पावसाळ्यात नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचे चित्र आहे. विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांकडून पाठपुरावा करण्यात येत असला, तरी अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

इतिहासात पराक्रम गाजवणाऱ्या मावळ्यांची ही भूमी म्हणून या परिसराची ओळख आहे. स्वराज्याच्या लढ्यात योगदान देणाऱ्या शूरवीरांच्या वारशाचा अभिमान बाळगणाऱ्या या भागाला आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या या गावाकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.दरम्यान, सत्यशोधक पत्रकार संघटनेने बडदेमाच गावातील समस्यांचा सखोल आढावा घेत वास्तव परिस्थिती जनतेसमोर मांडली आहे. गावातील रस्त्यांची दुर्दशा, नागरिकांच्या अडचणी आणि विकासाच्या रखडलेल्या कामांवर प्रकाश टाकणारा विशेष अहवाल प्रसिद्ध करण्यात आला असून सोशल मीडियावरही याबाबत जनजागृती सुरू आहे.ग्रामस्थांनी "मिशन बडदेमाच गावचा रस्ता" या अभियानाद्वारे आपला आवाज शासनापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आता प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधी या प्रश्नाची कितपत दखल घेतात आणि बडदेमाचच्या विकासाचा वनवास कधी संपतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे या गावाचा आवाज संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचतो का?या गावाच्या वेदना ऐकल्या जातात का?आणि सर्वात महत्त्वाचं...या गावाला अखेर न्याय मिळतो का ? याच प्रश्नांसह...“की पुढच्या निवडणुकीपर्यंत पुन्हा एकदा आश्वासनांचाच रस्ता या गावापर्यंत पोहोचणार?...”



“कारण मिशन बडदेमाचच्या ग्रामस्थांसाठी हा फक्त रस्त्याचा प्रश्न नाही... हा जगण्याचा प्रश्न आहे...हा अस्तित्वाचा प्रश्न आहे...आणि म्हणूनच या गावातील प्रत्येक घरात, प्रत्येक वाडीत, प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाच्या मनात एकच अपेक्षा आहे... की त्यांच्या आयुष्यात एकदा तरी विकासाची गाडी या गावापर्यंत पोहोचावी...आम्ही या गावात दोन दिवस आणि एक रात्र मुक्काम केला...ग्रामस्थांसोबत राहिलो...त्यांच्या घरात बसलो...

त्यांच्या अडचणी ऐकल्या...

त्यांच्यासोबत डोंगर उतरून चाललो... आणि त्या दोन दिवसांत एक गोष्ट प्रकर्षाने जाणवलीइथल्या लोकांच्या मागण्या मोठ्या नाहीत...

त्या रास्त आहेत...त्या न्याय्य आहेत...आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्या घटनात्मक अधिकाराशी संबंधित आहेत...

कारण रस्ता हा केवळ वाहतुकीचा विषय नसतो...

रस्ता म्हणजे प्रशासनापर्यंत पोहोचण्याचा मार्ग असतो...

रस्ता म्हणजे आरोग्यसेवेचा मार्ग असतो...रस्ता म्हणजे शिक्षणाचा मार्ग असतो...

रस्ता म्हणजे विकासाचा मार्ग असतो... आणि जेव्हा एखादं गाव रस्त्यापासून वंचित राहतं...

तेव्हा ते गाव अनेक योजनांपासून, अनेक संधींपासून आणि अनेक हक्कांपासूनही वंचित राहतं ग्रामस्थ सांगतात...

आजही गावात एखादं लग्नकार्य असलं...सण-उत्सव असला...

किंवा एखादी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली...

तर पहिला विचार कार्यक्रमाचा नसतो...पहिला विचार असतो...

लोक वर कसे येणार?

साहित्य वर कसं आणणार आणि एखादी अडचण आली तर खाली कसं जायचं?

विकासाची व्याख्या कागदावर वेगळी असू शकते...पण बडदेमाचमध्ये विकासाची व्याख्या खूप साधी आहे गावापर्यंत पोहोचणारा एक सक्षम रस्ता... आणि म्हणूनच आज या गावातील ग्रामस्थ मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, संबंधित विभागाचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडे हात जोडून विनंती करत आहेत...

आम्हाला मदतीची भाषा नको...

आम्हाला आश्वासनांची भाषा नको... आम्हाला प्रत्यक्ष काम हवं आहे... कारण २५ ते ३० वर्षांपासून आम्ही फक्त आश्वासनंच ऐकतआलो आहोत...आता आम्हाला परिणाम पाहायचे आहेत...

आज बडदेमाच डोंगरात उभं राहून प्रशासनाला एक प्रश्न विचारत आहे...जर या गावात तुमचं घर असतं...तुमचे आई-वडील राहत असते...

तुमची मुलं इथे शिक्षण घेत असती... तर तुम्ही ही परिस्थिती स्वीकारली असती का?

या प्रश्नाचं उत्तर कदाचित प्रत्येकाकडे असेल...पण त्या उत्तरासोबत कृती होणंही तितकंच आवश्यक आहे कारण प्रत्येक दिवसासोबत या गावातील वृद्धांची प्रतीक्षा वाढत आहे...प्रत्येक पावसाळ्यासोबत संघर्ष वाढत आहे...आणि प्रत्येक निवडणुकीसोबत आशा आणि निराशेचं चक्र पुन्हा सुरू होत आहे...बडदेमाचची ही कहाणी इथे संपत नाही...

**खरं तर इथूनच सुरू होते...**

कारण हा रिपोर्ट प्रसारित झाल्यानंतर प्रश्न असा असेल या गावाचा आवाज संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचतो का?

या गावाच्या वेदना ऐकल्या जातात का?आणि सर्वात महत्त्वाचं... या गावाला अखेर न्याय मिळतो का? स्पेशल रिपोर्ट :-पत्रकार सचिन पवार, सुनिल राजभर,प्रसाद गोरेगावकर,निखिल सुतार,रिजवान मुकादम,पांडुरंग सत्वे, नितेश पुरारकर, दिलीप करकरे,रुपेश फाटक, मंगेश मेस्त्री,सुबोध गोसावी,नंदकुमार चांदोरकर,विवेक काटोलकर,प्रदीप भादावकर,संतोष पाखुर्डे,मृणाली जाधव, आरोही गोसावी, संचिता गायकवाड, शितल सानप, मानसी महाडीक ...सत्यशोधक पत्रकार संघटनानी आढावा घेतला आहे.

# पावसाच्या आगमनापूर्वी श्रीवर्धन नगरपरिषद अलर्ट; शहरातील नाले-गटार स्वच्छतेची मोहीम जोमात

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन शहरात पावसामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य समस्या टाळण्यासाठी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. शहरातील नाले, गटारे आणि पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या मार्गांची स्वच्छता करण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, सध्या विविध भागांमध्य साफसफाईचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे अनेकदा नाले तुंबणे, रस्त्यांवर पाणी साचणे, वाहतुकीला अडथळे निर्माण होणे तसेच नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरण्यासारख्या समस्या निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर यंदा पावसाळ्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यावर नगरपरिषद प्रशासनाने भर दिला आहे.

शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठ परिसर, निवासी भाग, सार्वजनिक ठिकाणे तसेच पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या



मोठ्या नाल्यांमधील साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा, माती, झाडाझुडपे आणि इतर अडथळे काढण्याचे काम सुरू आहे. सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून नाले व गटारे पूर्ण क्षमतेने स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला जात असून, पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.

नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करून सफाई कामाचा आढावा घेत आहेत. ज्या ठिकाणी पाणी साचण्याची शक्यता आहे किंवा नाले अरुंद झाले आहेत, अशा भागांना प्राधान्य देऊन स्वच्छता करण्यात येत आहे.

श्रीवर्धन हे किनारपट्टी भागातील शहर असल्याने पावसाळ्यात येथे मोठ्या प्रमाणात पावसाचा सामना करावा लागतो. त्यामुळे नाले आणि गटारे स्वच्छ असणे ही शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. मागील काही वर्षांतील अनुभव लक्षात घेता प्रशासनाने यंदा पावसाळ्यापूर्वीच नियोजनबद्ध पद्धतीने कामाला सुरुवात केली आहे.

दरम्यान, नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांनाही स्वच्छतेबाबत सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी नाल्यांमध्ये प्लास्टिक पिशव्या, घरातील कचरा किंवा इतर टाकाऊ वस्तू टाकू नयेत. अशा प्रकारामुळे नाले तुंबून पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराची स्वच्छता राखून प्रशासनाच्या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी नाले व गटार सफाई ही शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र, ही मोहीम केवळ पावसाळ्यापुरती मर्यादित न ठेवता वर्षभर नियमित स्वच्छता आणि देखभाल सुरू ठेवावी, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही गैरसोयीला सामोरे जावे लागू नये, तसेच श्रीवर्धन शहर स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित राहावे, यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून सुरू असलेल्या या प्रयत्नांकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# नवी मुंबईच्या उत्तम डे गिर्यारोहकाने फ्रेंडशिप पीक केले सर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** नवी मुंबई स्थित गिर्यारोहक आणि निसर्गप्रेमी उत्तम डे यांनी हिमाचल प्रदेशातील फ्रेंडशिप पीक यशस्वीपणे सर केले आहे. हिमालयाच्या पीर पंजाल पर्वतश्रेणीतील 5,289 मीटर (17,353 फूट) उंच असलेले, फ्रेंडशिप पीक हे जास्त उंचीच्या पर्वतारोहणासाठी भारतातील सर्वाधिक मागणी असलेले शिखर म्हणून ओळखले जाते.

या मोहिमेस मनालीमध्ये सुरुवात झाली आणि सोलांग व्हॅली, अल्पाइन रान, मोरेन आणि हिमनदी असलेल्या भागामधून पुढे गेली. 9 जून रोजी रात्री 11 वाजता सुरू झालेल्या अंतिम टप्प्यापूर्वी लौहाली, लेडी लेग आणि समिट कॅम्प येथे या मोहिमेचे कॅम्प होते. रात्रभर चढणे अत्यावश्यक होते, कारण खिंडीच्या पलीकडे असलेले



भाग खड्डे आणि हिमस्खलन-प्रवण भूभागाचे होते. सूर्याने बर्फ निसरडा होण्यापूर्वी पहाटेच्या वेळी सुरक्षित उतरता आले. पालकांचा आशीर्वाद आणि भक्कम पाठबळ, देवाची कृपा, शांत वारा, स्वच्छ हवामान आणि मदर माउंटनच्या साक्षीने उत्तमने 10 तास चढाई केली आणि 10 जून 2026 रोजी सकाळी 6:05 वाजता ते शिखरावर पोहोचले. शिखरावर पोहोचल्यानंतर दोनच मिनिटात त्यांनी भारतीय राष्ट्रध्वज फडकावला आणि आनंदाश्रूनी त्यांचे डोळे भरून आले.

"जेव्हा तुम्ही तिच्या कुशीत येता तेव्हा तुम्ही नतमस्तक व्हाल याची खात्री पर्वत करतात. ते नम्रता शिकवतात, तुम्हाला आठवण करून देतात की स्वतःला किंवा पर्वताला कमी लेखू नका, पाय जमिनीवर भक्कम रोवून राहा आणि पुढे जात राहा," डे आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात. ते पुढे सांगतात, "माझ्यासारख्या पाच फूट उंचीच्या लोकांना अनेकदा कमी लेखले जाते. हे पर्वत मला बळ देतात. ते मला सांगतात, 'उत्तम, आयुष्यात स्वतःला कमी लेखू नकोस फक्त चालत राहा.' जेव्हा मी एखादे शिखर सर करतो, तेव्हा मी जगाला संदेश देतोः तुमची उंची कमी असली तरी ठीक आहे. कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी मजबूत आणि मोठी ध्येय गाठण्याची मानसिकता असणे महत्त्वाचे आहे."

# प्रा. बी. टी. भाऊ... विधानपरिषदेतील द्दढनिश्चयी भगीरथ !

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे अधिवेशन प्रतिनिधी** : विधानपरिषद या ज्येष्ठांच्या सभागृहात पदवीधर मतदार संघातून सलग पाच वेळा म्हणजे सन 1980 ते सन 2010 पर्यंत असे तीस वर्ष सदस्य म्हणून अतुलनीय योगदान दिलेले आदरणीय प्रा. बी. टी. देशमुख सर यांचे निधन म्हणजे एका भगीरथाच्या अविरत संघर्षपर्वाची अखेर आहे. ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे 19 ते 24 जुलै, 1998 अल्पकाळ अस्थायी सभापती (Pro-tem Chairman) होते. सन 1980 ते 1986 विदर्भ पदवीधर मतदारसंघ आणि त्यानंतर अमरावती पदवीधर मतदारसंघ ही त्यांची ओळख कायम राहिली. क्रिकेटच्या परिभाषेत सांगायचे झाले तर आक्रमक क्षेत्ररक्षण व्युहरचनेत फलंदाजाच्या अगदी समोर "फॉरवर्ड शॉर्टलेग" ची जागा असते. फलंदाज कितीही निष्णात असला तरी तो येथील चपळ क्षेत्ररक्षकामुळे मनोवैज्ञानिक दबावाखाली येतोच येतो... बी. टी. भाऊंचे विधानपरिषदेमधील आसन म्हणजे मंत्र्यांच्या दृष्टीने अगदी फॉरवर्ड शॉर्टलेगच ! बी. टी. भाऊ, सुरेश पाटील, प. म. पाटील, व्ही. यु. डायगव्हाणे या मंडळींनी भल्या भल्या मंत्र्यांना या फॉरवर्ड शॉर्टलेग वरुन लोकहिताच्या प्रश्नांसाठी जेरीस आणले, अनुकूल उत्तर – आश्वासन पदरात पाडून घेतले. आक्रमक विरोधी पक्षनेते श्री. नितीनजी गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर यांची साथ देखील महत्वाची ठरायची... सभागृह दणाणून सोडणे म्हणजे काय, याचा प्रत्यय त्यावेळी वार्ताहर गॅलरीने अगदी जवळून घेतला आहे. रथ-दांडेकर समितीचा अहवाल, विदर्भातील विकासाचा अनुशेष, तो दूर व्हावा यासाठी तातडीने काय काय उपाय योजना करायला हव्यात, वैधानिक विकास महामंडळ स्थापनेची आवश्यकता, अमरावतीचा पाणी प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न आणि ते सोडविण्यासाठी आवश्यक असलेली संघटना बांधणी, शेतकरी आत्महत्या अशा साऱ्या गोष्टींसाठी बी. टी. भाऊंनी विधानपरिषद सदस्यत्वाच्या माध्यमातून केलेला संघर्ष विलक्षण आहे. या संघर्षाचे स्वरुप अनेकदा विकासाच्या वाटेवरील सधन-समृध्द पश्चिम महाराष्ट्र विरुध्द अनुशेषग्रस्त विदर्भ अशा वळणावर गेल्याचे सभागृहाने अनुभवले. सन 1999 ते 2008 या कालावधीत ज्येष्ठ नेते श्री. जयंत पाटील हे राज्याचे वित्तमंत्री होते.



या काळात सभागृहात बी. टी. भाऊंनी सर्व उपलब्ध संसदीय आयुधांचा पर्याप्त वापर करीत वेळ प्रसंगी शासनाला धारेवर धरत अनुशेष निवारणार्थ संसाधनाच्या समन्यायी वाटपासाठी दिलेला लढा ऐतिहासिक ठरावा असाच आहे. सभापती महोदय, मंत्री महोदय असं कसं सांगताहेत... अशी हरकत घेत पुढे अतिशय आक्रमकपणे ते आपले मुद्दे मांडत... एका प्रसंगी नागपूर अधिवेशन काळात वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांच्याशी त्यांची सभागृहात चकमक झडली. दुसऱ्या दिवशी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना नागपूरच्या रूग्णालयात दाखल व्हावे लागले. वित्तमंत्री श्री. जयंत पाटील साहेब तातडीने त्यांची विचारपूस करण्यासाठी रूग्णालयात पोहचले. टोकाचे मतभेद असले तरी मनभेद नसावेत, महाराष्ट्राच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेचे हे महत्वाचे उदाहरण.

विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह सर्व राज्यांमध्ये नाही. या सभागृहाला काळाच्या ओघात वरिष्ठ सभागृह, ज्येष्ठांचे सभागृह, विद्वतजनांचे सभागृह, पुनर्विलोकन सभागृह (Revising Chamber) ही नामाभिदाने प्राप्त झालेली आहेत. ही नामाभिदाने किती यथार्थ आहेत त्याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे बी. टी. भाऊ. सिंचनासह विदर्भाच्या अनुशेषासंदर्भात आवाज उठवत असतांना त्यांनी सुचविलेल्या उपाययोजना पुढील काळासाठीचे यथायोग्य दिशादर्शक देखील आहेत.

बी. टी. भाऊंच्या विनियोजन विधेयक शिफारशीमुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च – एप्रिल 2003 दरम्यान घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यामुळे अधिवेशनाचे सुप वाजल्यावर पुन्हा विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन बोलवावे लागले. विनियोजन विधेयक विधानसभेने संमत करुन विधानपरिषदेकडे विचारार्थ पाठविले. विधानपरिषदेकडे ते आल्यावर बी. टी. भाऊंनी त्यास अनुशेषाच्या संदर्भात शिफारस केली आणि ती विधानपरिषद सभागृहाने संमत केली. त्यामुळे या शिफारशीसह हे विधेयक पुन्हा विधानसभेकडे पाठविण्यात आले, मात्र अधिवेशनाचा अखेरचा दिवस असल्याने शिफारशीसह विनियोजन विधेयक विधानसभेला प्राप्त झाले त्यावेळी विधानसभेचे अधिवेशनाचे कामकाज संस्थगित झाले होते. विनियोजन विधेयक शिफारशीसह मंजूर होण्यासाठी विधानसभेचे एक दिवसाचे अधिवेशन दिनांक 08 मे, 2003 रोजी पुन्हा बोलवावे लागले होते. महाराष्ट्र विधिमंडळाच्या वाटचालीतील बी. टी. भाऊंशी जोडला गेलेला हा प्रसंग वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा (CPA MAHARASHTRA BRANCH) ही देशातील पहिली शाखा आहे. सन्माननीय सदस्यांसाठी तसेच राज्यशास्त्र – लोकप्रशासन शाखेच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यासवर्ग, परदेश अभ्यास दौरे आणि विविध प्रबोधनात्मक उपक्रम विधानमंडळातील या संस्थेद्वारे राबविले जातात. राज्यशास्त्राचे प्राध्यापक असलेल्या बी. टी. भाऊंचे सीपीएशी अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. नागपूर अधिवेशन काळात सीपीए अभ्यासवर्गामध्ये दुपारच्या अनौपचारिक सत्रात बी. टी. भाऊंचा विद्यार्थ्यांबरोबर होणारा संवाद म्हणजे चिरंतन प्रेरक अनुभूती होय. सरकारकडून सीपीएला अनुदानापोटी प्राप्त झालेला फंड संस्थेचा खर्च भागविण्यासाठी मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात आला होता, काही तांत्रिक बाबी आणि महालेखाकारांची भूमिका यामुळे हा निधी परत जाण्याची शक्यता होती. यासंदर्भात तत्कालीन सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांनी सीपीए कार्यकारिणीची बैठक महालेखाकार, वित्त सचिवांसह बोलावली. प्रा. श्री. बी. टी. देशमुख सरांनी आपले सर्व कौशल्य आणि अनुभव पणाला लाऊन बिनतोड युक्तीवाद करत हा निधी परत जाण्यापासून रोखला, ज्या ठेवीच्या व्याजावर पुढे सीपीए लंडन मुख्यालय शुल्क, आशिया विभाग शुल्क आणि अभ्यास वर्गासारख्या विविध उपक्रमांचा खर्च भागविण्यात आला... तपस्वी जीवनशैली, अढळ तत्वनिष्ठा, अविरत सेवाभाव यांचा मापदंड मागे ठेवत आदरणीय बी. टी. भाऊ या आचार्याने शुक्रवार, दिनांक 19 जून, 2026 च्या रात्री निजधामाकडे प्रस्थान ठेवले. मुख्यमंत्री महोदयांनी शोकभावना व्यक्त करतांना एक पर्व संपले... असे म्हंटले ते अगदी खरे आहे.

देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके

चांदणे ज्यातून फाके शुभ्र पाऱ्यासारखे...

कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या या काव्यपंक्ती बी. टी. भाऊंचे स्मरण करतांना डोळ्यासमोर येतात. अस्वस्थ वर्तमानाच्या संदर्भात अशा दृढनिश्चयी भगीरथाचे आपल्यात नसणे वेदनादायी आहे. आम्हां राज्यशास्त्र विद्यार्थ्यांना सॉक्रेटिस - प्लेटो - ॲरिस्टॉटल शिकविणारे प्रा. बी. टी. देशमुख सर "तत्वज्ञ राजा"च्या भूमिकेत मात्र आमच्या हृदयात सदैव विराजमान राहतील...

**- निलेश मदाने**
**जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**मा. सभापती महोदयांचे जनसंपर्क अधिकारी**
**संचालक वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र**

## गाव विकासाची संकल्पना' चर्चासत्राला मुंबईस्थित चिंदरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर. गुडेकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिंदर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच पर्यटनाच्या माध्यमातून गावाला नवी ओळख निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'गाव विकासाची संकल्पना – पर्यटनातून सुंदर, आपलं चिंदर' या विशेष चर्चासत्राला मुंबईस्थित चिंदरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परळ येथील शिशु विकास हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात गावाच्या विकासासाठी विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.







या चर्चासत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री. धोंडी चिंदरकर (माजी सभापती तथा माजी सरपंच, ग्रामपंचायत चिंदर) उपस्थित होते. त्यांनी चिंदर गावाच्या विकासासाठी दीर्घकालीन नियोजन, पर्यटनवाढ, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा, स्वच्छता, जलसंधारण, सांस्कृतिक वारशाचे जतन आणि युवकांच्या सहभागाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित ग्रामस्थ, मुंबईस्थित चिंदरवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गावाच्या प्रगतीसाठी अनेक विधायक सूचना मांडल्या. गावातील निसर्गसंपदा, धार्मिक स्थळे, धबधबे, जलसाठे व इतर पर्यटनस्थळांचा नियोजनबद्ध विकास करून चिंदरला पर्यटनाच्या नकाशावर ठळक स्थान मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

चर्चासत्रात गावातील रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता अभियान, पर्यटनासाठी आवश्यक सुविधा, स्थानिक रोजगाराच्या संधी आणि युवा पिढीला विकास प्रक्रियेत सहभागी करून घेण्याबाबत विविध मते व्यक्त करण्यात आली. गावाच्या विकासासाठी मुंबईतील चिंदरवासीयांनीही आर्थिक, बौद्धिक व सामाजिक सहकार्य करण्याची तयारी दर्शविली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी "आपलं गाव – आपली जबाबदारी" या भावनेतून एकत्र येत चिंदरच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. पर्यटनविकासाबरोबरच गावाचा नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा जपत शाश्वत विकास साधण्यावर विशेष भर देण्यात आला.चर्चासत्राच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

## शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणे गरजेचे : महापौर नितीन पाटील

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : शालेय जीवनात यशस्वी होण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी आज पनवेल शहरातील पनवेल एज्युकेशन सोसायटी पनवेल यांच्यामार्फत आयोजित 10 वी व 12 वी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाप्रसंगी केले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नितीन पाटील, परिमंडळ 3 च्या पोलीस उपायुक्त डॉ.रश्मी नांदेडकर, पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इक्बाल काझी, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, मा.नगरसेवक मुकीत काझी, जुबेर पटेल, आलम पटेल, जाकीया काझी, असिफ करेल, नाविद पटेल, असीम पटेल, माझ मुल्ला, शाहनवाज पटेल, जुबेर पिट्टू, जब्बार पटेल, फय्याज दानवे, मा.नगरसेविका जैनाब शेख, सपोनि बजरंग राजपूत यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पनवेल शहर, तळोजा व बारापाडा या ठिकाणी पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या एकूण 3 शाळा असून जवळपास 4 हजार विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. यातील 10 वी व 12 वी मध्ये 90टक्के च्या वर गुण पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने संस्थेचे अध्यक्ष इक्बाल काझी यांनी तिन्ही शाळेतून प्रथम येणाऱ्या विद्यार्थीनीस 1 लाख रुपये रोख बक्षिस दिले. तसेच इतर विद्यार्थ्यांना रोख रक्कम, शालेपयोगी वस्तू आदींचे वाटप त्यांच्या खर्चाने करण्यात आले. यावेळी बोलताना महापौर नितीन पाटील यांनी इक्बाल काझी यांच्या मार्फत होत असलेल्या शिक्षणासाठी सढळ हाताने मदतीचे कौतुक केले. यावेळी महापौर यांनी स्वतःहून शालेय विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी 50 हजाराचा धनादेश दिला.

यानिमित्ताने बोलताना परिमंडळ 3 च्या डॉ.रश्मी नांदेडकर यांनी सांगितले की, शिक्षणाचे जीवनात महत्व असून प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे. या संस्थेच्या माध्यमातून अल्प फी घेवून तळागळातील मुलांना शिक्षण दिले जाते हे कौतुकास्पद आहे, यासाठी इक्बाल काझी हे दरवर्षी लाखो रुपयाचा निधी या शाळेसाठी स्वतः खर्च करीत आहेत. आगामी काळात या शाळेतून आपल्या देशाचे राष्ट्रपती डॉ.एम.पी.जे.अब्दुल कलाम हे निर्माण झाले पाहिजे, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. तर संस्थेचे चेअरमन इक्बाल काझी यांनी मुला-मुलींनी शिक्षण घेतलेच पाहिजे. आज सर्वच क्षेत्रात मुली आघाडीवर आहेत हे बघून आनंद होत आहे. या शाळेत सुद्धा टॉपरमध्ये मुलींचेच वर्चस्व आहे. शिक्षणासाठी कोणतीही कमी पडून देणार नाही व या शाळांना चांगल्यात चांगले शिक्षण कसे देता येईल याकडे आपण कायम लक्ष देत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष इक्बाल काझी यांचा वाढदिवस असल्याने सर्वांच्या उपस्थितीत केक कापण्यात आले तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी लकी ड्रॉ ही योजना राबवून त्यांना शालेपयोगी वस्तूंसह बॅग, शुज व आयफोन, सायकल भेट देण्यात आली. त्याचप्रमाणे निवृत्त झालेल्या मुख्याध्यापकांचा सत्कार या निमित्ताने करण्यात आला.

## आई फाउंडेशन व डॉ. रेड्डीज फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम; दिव्यांगांना रोजगाराचा आधार

### दिव्यांग रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद; स्वावलंबनाच्या दिशेने नवे पाऊल

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड** : दिव्यांग बांधवांनी स्वावलंबी बनून स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि रोजगाराच्या विविध संधी त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने आई फाउंडेशन आणि डॉ. रेडीज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोप्रोली येथे २० जून २०१६ रोजी युनियन बँक कोप्रोली येथील पटांगणात सकाळी १०:०० ते ०२ ०० या वेळेत दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास उरण व परिसरातील सुशिक्षित दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मेळाव्याच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराज तसेच उरण पूर्व विभागातील दिव्यांगांच्या हक्कांसाठी आयुष्यभर कार्य करणारे दिव्यांगांची माऊली म्हणून ओळखले जाणारे स्वर्गीय महादेव रामदास पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन व श्रीफळ अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर सौ. कविता रुपेश पाटील (सदस्य, उरण पंचायत समिती), विपुल म्हात्रे (माजी उपसरपंच, कोप्रोली), राकेश पाटील (संचालक,



साईकृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), सामाजिक कार्यकर्ते निर्भय म्हात्रे यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात दिव्यांग बांधवांना शुभेच्छा देत स्वावलंबन, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या बळावर जीवनातील अडचणींवर मात करण्याचे आवाहन केले. तसेच भविष्यात दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाहीही दिली.

मेळाव्यादरम्यान विविध क्षेत्रातील नामांकित संस्थांच्या रोजगार संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. उमेदवारांशी प्रत्यक्ष संवाद साधून मुलाखती घेण्यात आल्या. संपूर्ण कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या, उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

कार्यक्रमास सदिच्छा भेट देण्यासाठी महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूज चॅनलच्या कार्यकारी संपादक सौ. तृप्ती भोईर व त्यांचे यजमान घनश्याम भोईर उपस्थित राहिले. त्यांनीही दिव्यांग बांधवांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. त्याचबरोबर सदिच्छा भेट देण्यासाठी पुरणपंचायत समिती सदस्य सौ सायली पाटेकर आल्या होत्या

स्वर्गीय रामदास पाटील यांच्या प्रेरणेने कार्यरत असलेल्या दिव्यांग बांधवांनी "उठ अपंगा, जागा हो... आपल्या हक्काचा धागा हो" या विचाराला केंद्रस्थानी ठेवून समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या आई फाउंडेशनने यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रम राबविले असून हा रोजगार मेळावा त्याच मालिकेतील महत्त्वाचा उपक्रम ठरला.

तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या डॉ. रेड्डीज फाउंडेशनच्या मार्गदर्शनामुळे रोजगाराच्या संधी दिव्यांगांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या मेळाव्यातून घडून आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक कार्यकर्ते निर्भय म्हात्रे यांनी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांनी त्यांचे विशेष आभार मानले.

मेळाव्यास उपस्थित राहिलेल्या सर्व दिव्यांग बांधवांचे, त्यांच्या पालकांचे, स्वयंसेवकांचे तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवरांचे, आणि कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन करणाऱ्या सुनील वर्तक सर यांचे आयोजक आई फाउंडेशन आणि डॉ रेड्डीज फाउंडेशन यांनी मनःपूर्वक आभार मानले.

"दिव्यांगांना संधी मिळाल्यास ते केवळ सक्षमच नव्हे तर समाजाच्या प्रगतीचे प्रभावी भागीदार ठरू शकतात," हा संदेश देत दिव्यांग रोजगार मेळाव्याची यशस्वी सांगता झाली.

## मुंबई पोलाद व लोखंड बाजार समितीतील अनियमितता आणि भ्रष्टाचार प्रकरणी प्रहार संघटनेची मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सोबत बैठक संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : मुंबई पोलाद व लोखंड बाजार समितीतील अनियमितता आणि भ्रष्टाचार प्रकरणी प्रहार संघटनेने आज मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी बैठक घेवून प्रशासनातील 54 कोटी घोटाळा संबंधित जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून दोषी अधिकाऱ्यांची निलंबनाची मागणी केली आहे.

कळंबोली येथे असलेली आशिया खंडातील सर्वात मोठी व्यापार करीता असलेली मुंबई महानगर प्रदेश प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमिता आणि भ्रष्टाचार झाल्याचे लेखा परीक्षण अहवालातून उघड झाले आहे. त्यामुळे बाजार समितीचे अपरिमित नुकसान झाले असून या ठिकाणी लोखंड व पोलाद व्यापार करणाऱ्या व्यावसायिक यांच्यावर नियंत्रण आणि देखभाल करण्यासाठी शासनाने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीची स्थापना केली आहे. तसेच या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी व्यापारी यांच्याकडून सेवा शुल्क व कर आकारणी करून सेवा दिली जाते व आस्थापनाचा पूर्ण खर्च केला जातो. परंतु दोन वर्षापूर्वी मुदत ठेवी बँकेत गुंतवणूक करताना 54 कोटींचा घोटाळा झाला व त्यातून बाजार समितीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. याची दखल घेत शासनाने घोटाळा करणाऱ्या व आपले कर्तव्ये पार न पाडणाऱ्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, लेखा विभागातील अधिकारी आणि तत्कालीन बाजार समिती कार्यकारणी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले असताना, यावर बाजार समिती प्रशासन यांनी कारवाई केली नाही.

तसेच नियमबाह्य पद्धतीने कनिष्ठ अभियंता याला कार्यकारी अधिकारी या पदाचे अतिरिक्त कार्यभार देणे, सामाजिक सेवा सुविधा करिता आरक्षित असलेल्या भूखंडावरील अतिक्रमण काढणे, लोखंड व पोलाद व्यवसाय सोडून इतर व्यवसाय करणारे यांचे करारनामा रद्द करणे, नियमबाह्य पद्धतीने 3 वर्षापेक्षा जास्त कालावधी पूर्ण केलेल्या सेवा निवृत्त अधिकारी यांची सेवा समाप्त करणे, शासन निर्णय डावलून कंत्राटी पद्धतीने नियुक्ती दिलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना बाह्य यंत्रणे मार्फत पुन्हा नियुक्ती देणे व बाजार समिती यांनी आकृतिबंद प्रस्ताव तयार करून शासनास सादर करणे या प्रमुख मागण्यासाठी प्रहारच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. सदर बाजार समितीच्या प्रशासन सोबत पार पडलेल्या बैठकीत सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा होऊन नियमानुसार तत्काळ कारवाई करण्याचे आदेश राजेंद्र वीर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासनाला दिले आहेत. यावेळी बैठकी करिता प्रहारच्या वतीने डॉ. सुनील शिरीषकर, जिल्हा अध्यक्ष रायगड, अजय कदम, अभिनव येलवे, राहुल तेलंग, पंकज मोहिते आदी पदाधिकारी उपस्थित होते अशी माहिती प्रसिद्ध केलेल्या पत्रकाद्वारे डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिली आहे.

## आ. सुरेश धस यांची मोठी घोषणा

### प्रशासकीय कामांसाठी सोमीनाथ कोल्हे स्वीय सहाय्यक पदी तर रुग्णसेवेसाठी ॲड.महेश बेदरे यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुक्यातील नागरिकांच्या प्रशासकीय तसेच वैद्यकीय अडचणी अधिक प्रभावीपणे सोडविण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांनी दोन महत्त्वपूर्ण नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. तालुक्यातील विविध प्रशासकीय कामकाजासाठी सोमिनाथ कोल्हे यांची स्वीय सहाय्यक म्हणून तर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, आयुष्मान भारत योजना, रुग्णसेवा समिती तसेच विविध वैद्यकीय मदत योजनांच्या कामकाजासाठी ॲड.महेश बेदरे यांची अधिकृत सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवार दिनांक २० जून रोजी आमदार सुरेश धस यांनी या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. या नुसार तालुक्यातील नागरिकांच्या प्रशासकीय अडचणी, विविध शासकीय कार्यालयांशी संबंधित प्रश्न, जनहिताची कामे तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसंदर्भातील समन्वयाची व प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी सोमिनाथ कोल्हे यांच्या कडे सोपविण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, आयुष्मान भारत योजना, धर्मादाय रुग्णालय योजना तसेच इतर वैद्यकीय मदत योजनांचा लाभ गरजू रुग्णांना मिळवून देणे, त्यांच्या प्रस्तावांची



पूर्तता करणे व उपचारांशी संबंधित अडचणी सोडविणे या साठी ॲड.महेश बेदरे हे अधिकृत सहाय्यक म्हणून कार्यरत राहणार आहेत. आमदार सुरेश धस यांच्या वतीने गरजू रुग्णांनी वैद्यकीय मदत, शस्त्रक्रिया, उपचारासाठी आर्थिक सहाय्य अथवा विविध आरोग्य योजनांच्या लाभासाठी ॲड.महेश बेदरे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच प्रशासकीय कामकाज, शासकीय कार्यालयांशी संबंधित प्रश्न व जनतेच्या विविध अडचणींसाठी सोमिनाथ कोल्हे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन ही करण्यात आले आहे. दरम्यान या दोन्ही नियुक्त्यांचे पाटोदा तालुक्यासह विविध स्तरांतून स्वागत होत असून सोमिनाथ कोल्हे आणि ॲड.महेश बेदरे यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नवी मुंबईकरांच्या हक्काच्या पाण्याची चोरी ; देवद–विचुंबेत धडक कारवाई, तब्बल दोन कोटींच्या दंडाची नोटीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : नवी मुंबईकरांच्या हक्काच्या पाण्यावर डल्ला मारणाऱ्या अनधिकृत नळजोडणीविरोधात नवी मुंबई महानगरपालिकेने देवद-विचुंबे परिसरात धडक कारवाई करत मुख्य जलवाहिनीवरील बेकायदेशीर जोडणी निष्कासित केली आहे. मोरबे धरणातून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या 2050 मि.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीवर वारंवार छेडछाड करून पाण्याची चोरी होत असल्याचे उघड झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

महापालिकेला प्राप्त झालेल्या तक्रारीनंतर करण्यात आलेल्या पाहणीत मुख्य जलवाहिनीवर सुमारे 100 मि.मी. व्यासाची अनधिकृत नळजोडणी आढळून आली होती. एप्रिल 2025 मध्ये ही जोडणी खंडित करण्यात आली होती. त्यावेळी विचुंबे व देवद ग्रामपंचायतींना अनधिकृतरीत्या वापरलेल्या पाण्यापोटी 80 लाख 92 हजार 560 रुपयांचा दंड आकारण्यात आला होता.

त्यानंतर जानेवारी 2026 मध्ये जलवाहिनीच्या दुरुस्तीच्या वेळी त्याच ठिकाणी पुन्हा अनधिकृत जोडणी करण्यात आल्याचे आढळून आले. जोडणी काढण्यासाठी महापालिकेने प्रयत्न केले असता काही स्थानिकांकडून विरोध झाल्याने कारवाई पूर्ण होऊ शकली नव्हती. त्यानंतर पुन्हा नोटिसा बजावूनही संबंधितांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

यानंतर 28 मार्च 2026 रोजी पोलीस बंदोबस्तात अनधिकृत जोडणी खंडित करण्यात आली. मात्र, त्यानंतरही मुख्य जलवाहिनीशी पुन्हा छेडछाड करून पाण्याचा अनधिकृत वापर सुरू




असल्याचे महापालिकेच्या तपासणीत निदर्शनास आले. या दुसऱ्या प्रकरणात 1 कोटी 17 लाख 61 हजार 239 रुपयांचा दंड आकारण्याबाबत जिल्हा परिषद, रायगड यांना कळविण्यात आले.

विशेष म्हणजे या दोन्ही कारवायांमध्ये मिळून संबंधितांवर एकूण 1 कोटी 98 लाख 53 हजार 799 रुपयांचा दंडात्मक भार टाकण्यात आला आहे.

सदर प्रकार तिसऱ्यांदा उघडकीस आल्याने नवी मुंबई महानगरपालिकेने खांदेश्वर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 303(2), 326(अ), 125, 324, 3(5) तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम 1984 अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.दि. 19 जूनच्या रात्रीपासून 20 जूनच्या सकाळपर्यंत मोठ्या पोलीस बंदोबस्तात पुन्हा एकदा अनधिकृत नळजोडणी निष्कासित करण्यात आली. यापुढे जलवाहिनीशी छेडछाड करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा देत महापालिकेने घटनास्थळी सीसीटीव्ही देखील बसविले आहेत.महापालिकेच्या या कारवाईमुळे नवी मुंबईकरांच्या हक्काच्या पाण्याची चोरी करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सिल्लोड तालुक्यात मिरचीची 'होरपळ'; पाणीटंचाई अन् रोगाच्या विळख्याने पिके सुकली!

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यात जून महिना संपत आला तरी, अद्याप मान्सूनचा पत्ता नसल्याने संपूर्ण तालुक्यावर पावसाच्या दीर्घकालीन दडीचे सावट पसरले आहे. डोंगरगाव, रहिमाबाद, आसडी, अन्वी, पालोद,लिहाखेडी,गोळेगाव, विरगाव, खुल्लोड,उंडणगाव, हट्टी व सासुरवाडा यांसह संपूर्ण सिल्लोड तालुक्यात पावसाअभावी मिरचीचे पीक ऐन बहरात असतानाच गंभीर संकटात सापडले आहे. भीषण पाणीटंचाई आणि मिरचीच्या झाडांवर पडलेल्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे (पाने आकसणे/पर्णगुच्छ) मिरचीची पिके सुकू लागली आहेत. विहिरींनी तळ गाठल्याने पिकाला आवश्यक पाणी मिळेनासे झाले असून, शेतकऱ्यांचा एकरी सुमारे एक लाख रुपयांचा उत्पादन खर्च वाया जाण्याच्या मार्गावर आहे.

मान्सूनच्या दीर्घकालीन अभावामुळे जमिनीतील ओलावा पूर्णपणे संपला आहे. त्यातच कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने मिरचीची पाने आकसली असून झाडांची वाढ ठप्प झाली आहे. विहिरींच्या पाणी पातळीत कमालीची घट झाल्याने शेतकरी हतबल आहेत. पावसाचा पूर्णपणे अभाव असल्याने वाढते तापमान पिकाला घातक ठरत आहे.

एकीकडे उत्पादन खर्च आणि दुसरीकडे पावसाच्या अभावामुळे पीक वाया जात असल्याने बळीराजा हतबल झाला आहे. कर्जाची परतफेड कशी करायची, हा प्रश्न शेतकरी कुटुंबांसमोर उभा आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने बाधित क्षेत्राची पाहणी करून योग्य ती तांत्रिक कार्यवाही करावी आणि नियमानुसार मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.



**"पाऊस नसल्याने विहिरी आटल्यात, पिकाला पाणी देता येत नाहीये. त्यात रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने मिरचीची झाडे जळून चालली आहेत. लाखो रुपयांचा खर्च मातीत जाताना पाहून आता जगायचे कसे, हाच मोठा प्रश्न आहे."**

**–निवृत्ती सोनवणे,**
**बाधित शेतकरी, पालोद.**

**शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी**

- **अंदाजित उत्पादन खर्च: एकरी एक लाख रुपये.**
- **पिकाची सद्यस्थिती: पावसाअभावी जमिनीतील ओलावा संपला, पानांच्या आकसण्यामुळे वाढ ठप्प.**
- **पाणी टंचाई: विहिरींच्या पाणी पातळीत मोठी घट, पिकाला पाणी देण्यास मर्यादा.**
- **आर्थिक स्थिती: वाढत्या खर्चामुळे नवीन कर्ज घेण्यास शेतकऱ्यांसमोर मर्यादा.**
- **कौटुंबिक चिंता: मुलांचे शिक्षण आणि घरखर्चाचा प्रश्न गंभीर.**

# कविता फक्त आनंद देण्यासाठीच असावी - सुप्रसिद्ध कवी ए.के.शेख

## पनवेलमध्ये साहित्याचा शब्दवेलतर्फे कवी संमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : कविता फक्त आनंद देण्यासाठीच असावी असे मत सुप्रसिद्ध कवी ए.के.शेख यांनी श्री भगवती साई संस्थान,श्री साई नारायणबाबा आश्रम,पनवेल आणि लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथील साई मंदिरात साहित्याचा शब्दवेल आयोजित निमंत्रित कवी संमेलनात व्यक्त केले.




या कार्यक्रमास साहित्यिक अशोक भांडवलकर,सुधाकर चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिका जोशना राजपूत,भगवती साई संस्थान,श्री साई नारायणबाबा आश्रम,पनवेलचे सेक्रेटरी रामलाल चौधरी तसेच राम थदानी,लायन्स क्लब ऑफ सरगम पनवेलचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा तसेच संजय गोडसे,ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी,ज्येष्ठ कवी गणेश म्हात्रे आदी उपस्थित होते. यापुढे बोलताना ए.के.शेख म्हणाले,उत्तम कविता कधी आनंद देते,कधी अंतर्मुख करते,कधी सामाजिक वास्तवावर विचार करायला भाग पाडते तर कधी दु:ख,संघर्ष किंवा आशा यांचेही प्रभावी चित्रण करते त्यामुळे कवीने प्रामाणिकपणे आपल्या अनुभवांना आणि भावनांना शब्दरूप द्यावे त्यातून वाचकांपर्यंत भावनिक आणि वैचारिक संवाद पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे.नवोदित कवींना वाचकांशी नाते जोडण्याची जाणीव करून देते.कविता ही आनंदासह संवेदनशीलता,चिंतन आणि समाजभान जागवणारी असावी,असे सांगून गझल आणि कविता कशी असावी याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी साहित्यिक अशोक भांडवलकर,सुधाकर चव्हाण, जोशना राजपूत,भगवती साई संस्थान,श्री साई नारायणबाबा आश्रम,पनवेलचे सेक्रेटरी रामलाल चौधरी यांची भाषणे झाली.

पाऊस,प्रेम,पोवाडा,समाज, पर्यावरण,नातेसंबंध,आई-वडील, निसर्ग आदी विषयांवर कवींनीं आपल्या कविता सादर केल्या. उपस्थित कवींना आयोजकांतर्फे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. नवोदीत कवींना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजक आणि संस्थांचे मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी यांनी केले

तर उपस्थितांचे आभार संजय गोडसे यांनी मानले.स्वागत गीत अरुण द. म्हात्रे यांनी गायले. सध्या वाढत्या प्रदूषण आणि जंगलतोडीमुळे आपल्याला चिमण्या कुठेच दिसत नाहीत. नवीन पिढीला चिमण्या या फक्त पुस्तकामधूनच माहित होतात,या साठी लायन्स पनवेल सरगमतर्फे चिमण्यांच्या संवर्धनासाठी पाहुण्यांना चिमण्यांच्या घरट्यांची भेट म्हणून देण्यात आली.

# राजिप शाळा नविन शेवे येथे 'शाळा पूर्वतयारी मेळावा २' आणि प्रवेशोत्सव उत्साहात; तिरंगा कमान व सेल्फी पॉईंट ठरले मुख्य आकर्षण!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : रायगड जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, नवीन शेवे येथे सोमवार, दिनांक १५ जून रोजी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत 'शाळा पूर्वतयारी अभियान' व 'शाळा प्रवेशोत्सव' अतिशय उत्साहात आणि आनंदी वातावरणात पार पडला.५ वर्षे पूर्ण झालेल्या चिमुकल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आनंदाने रुजवण्यासाठी या विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात लेझीमच्या तालावर चिमुकल्यांच्या जंगी स्वागताने झाली. मेळाव्याचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य दिपक भोईर आणि नव्याने दाखल होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

मुख्याध्यापिकांनी सर्व मुलांचे औक्षण केले. शाळेत प्रवेश करताना चिमुकल्यांच्या पावलांचे ठसे घेण्याचा एक अनोखा उपक्रम यावेळी राबवण्यात आला.या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेच्या प्रवेशद्वारावर उभारलेली 'सुस्वागतम' लिहिलेली देखणी तिरंगा कमान आणि फुग्यांची सजावट ही होती. हा संपूर्ण आकर्षक सेल्फी पॉईंट व कमान शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनंत म्हात्रे यांच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली होती. रंगीबेरंगी टोप्या घालून चिमुकल्यांनी या सेल्फी पॉईंटवर आनंदाने फोटो काढले. शाळेच्या वतीने मुलांना फुगे, चॉकलेट्स आणि कागदी फुले देऊन त्यांचे मनापासून स्वागत करण्यात आले.

या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या वतीने ७ वेगवेगळ्या स्टॉल्सची मांडणी करण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने शारीरिक विकास, बौद्धिक विकास ,भाषा विकास, गणन तयारी या विविध उपक्रमांद्वारे मुलांच्या पूर्वतयारीची पडताळणी करण्यात आली. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद त्यांच्या विकास पत्रामध्ये करण्यात आली.

या मेळाव्याला उरणचे नायब तहसीलदार महेश पाटील साहेब आणि पंचायत समिती सदस्य दीपक भोईर यांनी विशेष भेट दिली. याप्रसंगी नवीन शेवेचे केंद्रप्रमुख शंकर म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य अशोक दर्णे, शाळा व्यवस्थापन समिती नवीन शेवे अध्यक्ष अनंत म्हात्रे, उपाध्यक्ष मकरंद भुरे, तंटामुक्ती गाव अध्यक्ष श्रीकृष्ण घरत, स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयाचे उपाध्यक्ष गणेश म्हात्रे, स्वातंत्रवीर सावरकर विद्यालयाचे प्राचार्य संतोष म्हात्रे, सहशिक्षक नायडू सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका मोहिनी पाटील, मच्छिंद्र म्हात्रे, प्रवीण म्हात्रे ,शर्मिला गावंड, चैताली म्हात्रे ,अतिता पाटील, ज्योती पाटील स्थानिक अंगणवाडी शिक्षिका यांच्यासह नवीन शेवे शाळेतील सर्व शिक्षक वृंद व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. या शाळा प्रवेशोत्सवासाठी नवीन दाखल झालेले विद्यार्थी त्यांचे पालक शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योगेंद्र काटेखाये जिल्हास्तरीय उत्कृष्ट शालेय उपक्रमशील पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -तालुक्यातील पहेला येथील गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील मुख्याध्यापक योगेंद्र काटेखाये यांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील डॉक्टर, पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, नृत्यांगना,कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात ,त्यांच्या कार्याला गती मिळावी, व त्यांना सन्मान मिळावा उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात योगेंद्र काटेखाये यांच्या शैक्षणिक सामाजिक सेवेतील कार्याची पावती म्हणून जिल्हास्तरीय उत्कृष्ट शालेय उपक्रमशिल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हे मागील 20 वर्षापासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.



याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

शुभदा धुर्वे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# सिडकोचे एमडी अश्विन मुदगल यांना महेंद्रशेठ घरत यांनी दिल्या शुभेच्छा!

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** सिडकोचे नवनियुक्त एमडी अश्विन मुदगल यांची आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि प्रकल्पग्रस्तांना खेळासाठी मैदाने मिळवून देणारे, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा म्हणून धडपडणारे महेंद्रशेठ घरत यांनी सोमवारी (ता. 22 ) सदिच्छा भेट घेतली आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मनमोकळा संवाद साधला. अश्विन मुदगल यांची अतिशय कार्यतत्पर अधिकारी अशी ओळख आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांच्या समस्या मार्गी लागतील, असा आशावाद महेंद्रशेठ घरत यांना आहे.



अश्विन मुदगल यांना सुमारे 18 वर्षांचा प्रशासकीय अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून त्यांनी कामाचा ठसा उमटवला आहे. यापूर्वी त्यांनी सिडकोत सहव्यवस्थापकीय संचालक म्हणूनही काम केले आहे. त्यामुळे सिडकोचा गाढा अभ्यास अश्विन मुदगल यांना आहे. त्याचा फायदा सिडकोचे रखडलेले आणि नवीन प्रकल्प मार्गी लावण्यासाठी होईल, असाही आशावादही महेंद्रशेठ घरत यांनी व्यक्त केला.

# रेवदंडा व परिसरात मान्सूनची दमदार एंट्री; मुसळधार सरींनी उकाड्याला दिला दणका, नागरिकांचा जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : गेल्या अनेक दिवसांपासून उकाड्याने अक्षरशः हैराण झालेल्या रेवदंडा व ग्रामीण भागातील नागरिकांना अखेर मान्सूनच्या दमदार आगमनाने मोठा दिलासा मिळाला आहे. दडी मारून बसलेल्या पावसाने सोमवारी अचानक जोरदार हजेरी लावत संपूर्ण परिसराला अक्षरशः झोडपून काढले. पावसाच्या सरींनी वातावरणात सुखद गारवा निर्माण झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, उष्णतेच्या तडाख्याने त्रस्त झालेल्या जनजीवनाला मोठा दिलासा मिळाला आहे.

सकाळपासूनच आभाळ भरून आले होते. काळ्याभोर ढगांनी आकाश व्यापले आणि काही वेळातच पावसाने दमदार सुरुवात केली. रस्ते, शेतशिवार, झाडे आणि घरांचे परिसर पावसाच्या सरींनी चिंब भिजून निघाले. अचानक कोसळलेल्या पावसामुळे काही ठिकाणी वाहनचालकांची धावपळ उडाली, तर अनेकांनी पावसाचा आनंद घेण्यासाठी घराबाहेर पडणे पसंत केले.दरम्यान, पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या लहान मुलांचा आनंद मात्र गगनात मावेनासा झाला होता. परिसरातील बच्चे कंपनी आणि युवकांनी पावसात भिजत मनमुराद आनंद लुटला. काही ठिकाणी क्रिकेटचे सामने रंगले, तर काहींनी फुटबॉल आणि इतर मैदानी खेळांचा आस्वाद घेतला. पावसाच्या सरींमध्ये भिजताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले निरागस हास्य आणि उत्साहाचे चित्र सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते.

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानामुळे नागरिक त्रस्त झाले होते. घराबाहेर पडणेही कठीण झाले होते. अशा परिस्थितीत आलेल्या पावसाने केवळ उष्णतेपासून दिलासा दिला नाही, तर वातावरणालाही नवचैतन्य प्राप्त करून दिले. अनेक नागरिकांनी या पावसाचे स्वागत करत "आता खऱ्या अर्थाने मान्सून सुरू झाला," अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.पावसाच्या आगमनामुळे शेतकरी वर्गातही समाधानाचे वातावरण आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण केली असून, पावसाच्या या सुरुवातीमुळे आगामी खरीप हंगामाबाबत आशावाद वाढला आहे. वेळेवर आणि समाधानकारक पाऊस झाल्यास यंदाच्या हंगामात चांगले उत्पादन मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.एकूणच, रेवदंडा व ग्रामीण भागात झालेल्या मान्सूनच्या दमदार आगमनाने उकाड्याने त्रस्त नागरिकांना दिलासा मिळाला असून, लहान मुलांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वांच्याच चेहऱ्यावर समाधान आणि आनंद फुलल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# वाढत्या वयातही तंदुरुस्ती राखण्यासाठी योग उपयुक्त ; आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त न्यूईरा हॉस्पिटलमध्ये विशेष सत्राचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त वाशीतील न्यूईरा हॉस्पिटलच्या वतीने 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. योगाच्या माध्यमातून शारीरिक हालचाल, मानसिक शांतता आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देत निरोगी आरोग्यासाठी आवश्यक सवयी अंगीकारण्याचे महत्त्व या कार्यक्रमातून अधोरेखित करण्यात आले.योग प्रशिक्षिका श्रीमती इला त्रिवेदी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.वाढत्या वयातही नियमित स्ट्रेचिंग, श्वसनाचे व्यायाम आणि माइंडफुलनेससारख्या साध्या सवयी अॅगीकारल्यास शरीराची बळकटी राखण्यासाठी, तणाव कमी करण्यास आणि एकूण आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होते असा सल्ला यावेळी देण्यात आला.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रायगड जिल्हा परिषदेत महिला व बालकल्याण विभागातील कोट्यवधींच्या कथित घोटाळ्याचा पर्दाफाश; सभापती रसिका केणींचे गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी :दिपक कोळवणकर** : रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती रसिका राजा केणी यांनी पदभार स्वीकारताच स्वतःच्या विभागातील कथित भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांवर थेट बोट ठेवत प्रशासनाला धारेवर धरले आहे. गेल्या चार वर्षांच्या प्रशासकीय कालावधीत महिला व बालकल्याण विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध योजनांमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला असून विभाग प्रमुख निर्मला कुचिक यांच्यावर थेट जबाबदारी निश्चित करत चौकशी व कारवाईची मागणी केली आहे.

गुरुवारी जिल्हा परिषद मुख्यालयातील आपल्या दालनात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केणी यांनी अनेक धक्कादायक बाबी उघड केल्या. डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान जिल्ह्यातील ७१४ अंगणवाड्यांना वीजजोडणी देण्यासाठी सुमारे अडीच कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली. मात्र सहा महिने उलटूनही प्रत्यक्षात कामे पूर्ण झाली नसून केवळ कागदोपत्री हालचाली सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.

"फक्त फाईली रंगवून शासकीय निधी लाटण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकारात विभाग प्रमुख निर्मला कुचिक तसेच काही तालुका स्तरावरील अधिकारी सहभागी असल्याचा संशय आहे," असा गंभीर आरोप केणी यांनी केला.

अंगणवाड्यांमध्ये सौरऊर्जा प्रकल्पांतर्गत बसविण्यात आलेल्या सोलर पॅनल्सचीही अवस्था दयनीय असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक ठिकाणी सोलर पॅनल बसवूनही वीजजोडणीच करण्यात आलेली नाही. परिणामी लाखो रुपयांचे साहित्य धूळ खात पडले असून कामे अपूर्ण असतानाच कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांची बिले अदा करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

स्थानिक कंत्राटदारांवर अन्याय झाल्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला. "रायगडमध्ये सक्षम कंत्राटदार




उपलब्ध असतानाही सातत्याने पुण्यातील काही मोजक्याच कंत्राटदारांना कामे देण्यात आली. प्रशासकीय कालावधीपासून आजपर्यंत त्याच नावांना प्राधान्य दिले जात आहे. यामागे मोठे आर्थिक हितसंबंध आणि देणंघेण असल्याचा संशय निर्माण होतो," असे केणी म्हणाल्या.

अंगणवाडीतील मुलांच्या खाऊ वाटप, गणवेश वितरण आणि गरोदर महिलांसाठीच्या पोषण किट योजनांमध्येही मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला. "कागदोपत्री १०० टक्के वितरण दाखवले जाते; मात्र प्रत्यक्षात केवळ २५ टक्के लाभार्थ्यांपर्यंत साहित्य पोहोचते. उर्वरित ७५ टक्के साहित्याच्या नावाखाली शासकीय निधी परस्पर लाटला जात आहे," असा दावा त्यांनी केला.

या सर्व प्रकारासाठी विभागीय अधिकाऱ्यांसोबतच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचीही जबाबदारी असल्याचे सांगत केणी यांनी सवाल उपस्थित केला. "टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊनही कामे रखडली असताना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्याची दखल का घेतली नाही? लहान मुले आणि गरोदर मातांशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषयांकडे प्रशासनाने गांभीर्याने का पाहिले नाही?" असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, महिला व बालकल्याण सभापतींनीच स्वतःच्या विभागातील कथित गैरव्यवहारांवर उघडपणे आरोप केल्याने जिल्हा परिषदेत मोठी खळबळ उडाली आहे. या आरोपांमुळे महिला व बालकल्याण विभागातील अनेक कामांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून व्यापक चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.

मात्र, सभापतींनी केलेले सर्व आरोप फेटाळून लावत विभाग प्रमुख निर्मला कुचिक यांनी, "विभागातील सर्व कामे नियमांनुसार आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात आली आहेत.

आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही," अशी प्रतिक्रिया दिली आहे.

## यामिनीताई बांडेबुचे विदर्भ स्तरीय नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -तालुक्यातील पहेला येथील रहिवासी यामिनीताई सुरेश बांडेबुचे माजी जि प सदस्य भंडारा यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील डॉक्टर, पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, नृत्यांगना,कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात ,त्यांच्या कार्याला गती मिळावी, व त्यांना सन्मान मिळावा उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात यामिनीताई सुरेश बांडेबुचे यांच्या सामाजिक कार्याची पावती म्हणून विदर्भस्तरीय नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ह्या मागील 30 वर्षापासून सामाजिक सेवेत कार्यरत आहेत



याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले . यामिनी बांडेबुचे यांना मिळालेल्या नारीशक्ती पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

## प्रवेशपत्राचा घोळ, सुरक्षेचा बोजवारा ! पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधानभवनात गोंधळ

**ज्योत्सना करवाडे अधिवेशन प्रतिनिधी** : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर प्रवेशपत्र प्रक्रियेत अचानक करण्यात आलेल्या बदलामुळे सोमवारी विधानभवन परिसरात अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला. अधिवेशन सुरू होण्याच्या अवघ्या दोन दिवस आधी जुनी प्रवेश व्यवस्था बंद करून नवीन डिजिटल फेस-स्कॅनिंग प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने पत्रकार, शासकीय अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधानपरिषद सभापती राम शिंदे यांच्या पुढाकाराने ही नवीन व्यवस्था लागू करण्यात आली. त्यानुसार सर्व संबंधितांना चेहरा पडताळणी (Face Verification) करूनच विधानभवनात प्रवेश देण्याचे निश्चित करण्यात आले होते. यासाठी शनिवार आणि रविवारी सकाळी १ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत विधानभवनात प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते.

ज्यांना प्रत्यक्ष येणे शक्य नव्हते, त्यांना फोटो व आवश्यक माहिती ई-मेलद्वारे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले होते.

संबंधितांचा डेटा पडताळून सर्वांना पुष्टीकरणाचा संदेश (Verification Message) पाठविण्यात येईल, असे सांगण्यात आले होते.

मात्र अधिवेशनाच्या पूर्वसंध्येपर्यंत बहुतांश व्यक्तींना कोणताही संदेश प्राप्त झाला नाही. परिणामी सोमवारी सकाळी विधानभवनात प्रवेशासाठी मोठी गर्दी झाली आणि प्रवेशद्वारांवर झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या नव्या व्यवस्थेचा फटका आमदार भाई जगताप यांनाही बसला. त्यांनी पूर्वीच आपला फोटो सादर केला होता. मात्र प्रत्यक्ष प्रवेशावेळी फेस-रीडिंग प्रणालीने त्यांची ओळख पटवली नाही. चेहरा स्कॅन होत असूनही प्रवेशद्वार उघडत नसल्याने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. एका विद्यमान आमदारालाच अशा अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर सामान्य पत्रकार, कर्मचारी आणि अभ्यागतांची अवस्था काय झाली असेल, असा प्रश्न उपस्थितांकडून विचारला जात होता.

अशा प्रकारच्या अनेक तक्रारी पत्रकार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडूनही करण्यात आल्या. विशेष म्हणजे, सुरक्षेच्या नावाखाली राबविण्यात आलेल्या या नव्या व्यवस्थेमुळेच प्रवेशद्वारांवर मोठी गर्दी निर्माण झाली. त्यामुळे सुरक्षेची हमी मिळण्याऐवजी सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी डिजिटल प्रवेश व्यवस्थेचा फज्जा उडाल्याने संबंधित प्रशासन आणि विधिमंडळ सचिवालयावर टीकेची झोड उठत आहे.

दरम्यान, दिवसअखेरही अनेकांचे व्हेरिफिकेशन आणि प्रवेश प्रक्रियेबाबत संभ्रम कायम असल्याने विधानभवन परिसरात गोंधळाचे वातावरण कायम होते.

## महावितरणची 'स्मार्ट' क्रांती: नागपूर परिमंडलातील ग्राहकांची 5.70 कोटींची मोठी आर्थिक बचत

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : वाढत्या महागाईच्या काळात सामान्य ग्राहकांच्या खिशाला होणारी कात्री लक्षात घेता, महावितरणने राबवलेली 'स्मार्ट टीओडी' (Time of Day) मीटर योजना नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहकांसाठी खऱ्या अर्थाने 'लक्ष्मी' ठरत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना आर्थिक सवलत देण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमातून गेल्या दहा महिन्यांत ग्राहकांनी तब्बल 5 कोटी 70 लाख रुपयांची भरघोस बचत केली आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार, महावितरणने सौर उर्जेच्या वापराला चालना देण्यासाठी ही योजना कार्यान्वित केली आहे. दिवसा सौर उर्जेची उपलब्धता जास्त असल्याने, ती इतर पारंपरिक स्रोतांच्या तुलनेत स्वस्त असते. याच स्वस्त विजेचा थेट लाभ ग्राहकांना मिळावा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत, सकाळी 9 ते सायंकाळी5या वेळेत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना चालू आर्थिक वर्षात प्रति युनिट 85 पैशांची थेट सवलत दिली जात आहे. ही सवलत भविष्यात 1 रुपयापर्यंत वाढवण्याचे महावितरणचे नियोजन आहे.

योजनेच्या अंमलबजावणीनंतर ग्राहकांचा मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. जुलै 2025 ते एप्रिल 2026 या दहा महिन्यांच्या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील ग्राहकांनी 5 कोटी 5 लाख 53 हजार रुपयांची बचत केली आहे, तर वर्धा जिल्ह्यातील ग्राहकांच्या खात्यात 65 लाख 19 हजार रुपयांची बचत जमा झाली आहे. परिमंडलातील घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक अशा विविध प्रवर्गांतील सुमारे 7.31 लाख ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले असून, उर्वरित ग्राहकांनाही लवकरच या प्रक्रियेत सामावून घेतले जाणार आहे. या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ग्राहकांचे 'डिजिटल सक्षमीकरण'. 'एमसीएल महा ऊर्जा' ॲपच्या माध्यमातून ग्राहक आता आपल्या वीज वापराचा 'रिअल-टाइम' डेटा पाहू शकतात. मीटर रीडिंगची प्रक्रिया पूर्णपणे स्वयंचलित असल्याने मानवी चुकांना पूर्णविराम मिळाला आहे. ग्राहकांना दर तासाला किंवा दिवसाला किती वीज वापरली, याची माहिती मिळत असल्याने विजेचा वापर नियोजित करणे आता सहज शक्य झाले आहे. बिलांमधील विसंगतीची समस्या दूर होऊन ग्राहकांना त्यांच्या प्रत्यक्ष वापराचेच बिल मिळत आहे. काही ठिकाणी स्मार्ट मीटरबद्दल चुकीचे समज पसरवून या प्रक्रियेला विरोध दर्शविला जात आहे. यावर नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. "स्मार्ट मीटर बसवण्यासाठी महावितरण कोणतेही शुल्क आकारत नाही, ही प्रक्रिया पूर्णतः मोफत आहे. हे मीटर अधिक अचूक वाचन देतात, त्यामुळे बिल वाढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.48 तासांत वीज पुरवठा खंडित होईल किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या अफवांवर ग्राहकांनी विश्वास ठेवू नये," असे आवाहन त्यांनी केले आहे. डेटा सुरक्षिततेबाबतही महावितरणने स्पष्ट केले आहे की, मीटरमधील सर्व माहिती एनक्रिप्टेड स्वरूपात असल्याने ती अत्यंत सुरक्षित आहे.

बँकिंग, रेल्वे आणि मोबाईल सेवांप्रमाणेच वीज वितरण व्यवस्थेला डिजिटल आणि आधुनिक करणे, हे महावितरणचे उद्दिष्ट आहे. स्मार्ट मीटर हे या आधुनिक ऊर्जा व्यवस्थापनाच्या दिशेने टाकलेले पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. अचूक बिलिंग, तक्रारींचे जलद निराकरण आणि सौर उर्जेचा अधिकाधिक वापर या त्रिसूत्रीमुळे नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहक आता खऱ्या अर्थाने सक्षम झाले आहेत. भविष्यात सर्वच ग्राहकांना या स्मार्ट सेवेचा लाभ मिळणार असल्याने, वीज वापराची ही 'स्मार्ट' संस्कृती ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत वीज क्रांती घडवून आणेल, असा विश्वास महावितरणने व्यक्त केला आहे.

## शुभदा धुर्वे नायब तहसीलदार पवनी कर्तव्यदक्ष अधिकारी जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -पवनी येथील नायब तहसीलदार सुभदा धुर्वे यांच्या शासकीय सेवेतील सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील डॉक्टर, पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, नृत्यांगना,कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात ,त्यांच्या कार्याला गती मिळावी, व त्यांना सन्मान मिळावा उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य



पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात सुभदा धुर्वे यांच्या शासकीय सेवेतील सामाजिक कार्याची पावती म्हणून जिल्हास्तरीय कर्तव्यदक्ष अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हे मागील 15 वर्षापासून शासकीय सेवेत कार्यरत आहेत. याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले . शुभदा धुर्वे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

## डॉ. अक्षय कहालकर पारंपारिक वैद्यकीय सेवा व आदर्श समाजसेवक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** - येथील डॉ. ईस्तारीजी कहालकर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील डॉक्टर, पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, नृत्यांगना,कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात ,त्यांच्या कार्याला गती मिळावी, व त्यांना



सन्मान मिळावा उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात डॉ. अक्षयराव इस्तारीजी कहालकर यांच्या वैद्यकीय सेवा व सामाजिक कार्याची पावती म्हणून त्यांना पारंपारिक वैद्य ,वैद्यकीय सेवा व आदर्श समाजसेवक सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पारंपारिक वैद्य ,वैद्यकीय सेवा व आदर्श समाजसेवक पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

## सुदृढ महिला– सुदृढ कुटुंब : सोयगावात मोफत स्त्रीरोग व प्रसूती तपासणी शिबिर आज

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी**

**विजय काळे** : महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी साने हॉस्पिटल व भारतीय जनता पार्टी,सोयगाव शहर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.२३ जून २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय,सोयगाव येथील कोविड सेंटरमध्ये मोफत स्त्रीरोग व प्रसूती तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. मधुरी सानप (एमबीबीएस, डीजीओ) या महिलांची तपासणी करून तज्ज्ञ मार्गदर्शन व समुपदेशन करणार




आहेत.महिलांच्या विविध आरोग्य समस्यांबाबत सखोल सल्ला देण्याबरोबरच आवश्यक तपासण्या देखील करण्यात येणार आहेत.

शिबिरामध्ये मासिक पाळीच्या तक्रारी, गर्भधारणेपूर्व व गर्भधारणेदरम्यान मार्गदर्शन, वंध्यत्व (इन्फर्टिलिटी) समस्या, पांढरा स्त्राव,गर्भाशयाच्या तक्रारी, रजोनिवृत्तीशी संबंधित अडचणी, गर्भवती महिलांची नियमित तपासणी,कुटुंब नियोजन सल्ला तसेच पीसीओएस/पीसीओडी तपासणी व मार्गदर्शन अशा विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय मोफत शुगर तपासणी, ईसीजी तपासणी आणि औषधांचे वितरणही करण्यात येणार आहे.शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या सौ.पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या हस्ते होणार असून,सौ. तेजस्विनी रोहित काळे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.महिलांनी आपल्या जुन्या वैद्यकीय अहवालांसह उपस्थित राहून या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन आयोजकांनी केले आहे. महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या सुदृढतेचा पाया असून,वेळेवर निदान व उपचार हे उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले."सुदृढ महिला– सुदृढ कुटुंब" या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा,असे आवाहन साने हॉस्पिटल व भारतीय जनता पार्टी, सोयगाव शहर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नागरीकरणाच्या वेगाला सुविधांची साथ कधी?

नवी मुंबईसह ठाणे,मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली,पनवेल आणि नवीन पनवेल या शहरांमध्ये गेल्या काही वर्षांत नागरीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.उंचच उंच निवासी टॉवर्स,व्यावसायिक संकुले,आयटी पार्क,मॉल्स आणि नव्या वसाहती उभ्या राहत आहेत.या विकासामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्या आणि शहरांची आर्थिक प्रगती होत असली,तरी त्याच वेगाने मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास होताना दिसत नाही.परिणामी अनेक शहरांमध्ये विकास आणि सुविधा यांच्यातील तफावत दिवसेंदिवस वाढत आहे.नवीन बांधकाम प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर मंजुरी दिली जात असताना त्या भागातील उपलब्ध पाणीपुरवठा,सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची क्षमता,रस्त्यांची वहनक्षमता,सार्वजनिक वाहतूक व्यवस्था,पार्किंगची सुविधा आणि पावसाळी पाण्याचा निचरा यांचा पुरेसा विचार केला जातो का,हा प्रश्न उपस्थित होत आहे.अनेक भागांमध्ये हजारो नवीन घरे उभी राहत आहेत; मात्र त्यानुसार पाणीपुरवठा वाढत नाही.परिणामी नागरिकांना कमी दाबाने पाणी मिळणे,पाणी कपात किंवा टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येते.वाहतुकीची समस्या देखील दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.नवीन निवासी व व्यावसायिक प्रकल्पांमुळे वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे; परंतु रस्त्यांची रुंदी,जोडरस्ते आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था त्याच प्रमाणात विकसित झालेली नाही.त्यामुळे सकाळ-संध्याकाळ वाहतूक कोंडी ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे.



वाहतूक कोंडीमुळे वेळ,इंधन आणि उत्पादकता यांचे मोठे नुकसान होत असून पर्यावरणीय प्रदूषणातही वाढ होत आहे.पावसाळ्यातील जलभराव ही आणखी एक गंभीर समस्या आहे.अनेक शहरांमध्ये नालेसफाई,पर्जन्य जलवाहिन्यांचे जाळे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याच्या यंत्रणा अपुऱ्या पडत आहेत. थोड्याशा मुसळधार पावसानंतरही रस्ते पाण्याखाली जातात,वाहतूक ठप्प होते आणि नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो.काही ठिकाणी सांडपाणी आणि पावसाचे पाणी एकत्र मिसळल्यामुळे आरोग्याच्या समस्याही निर्माण होतात. नगररचना करताना केवळ बांधकाम परवानग्या देणे हा विकासाचा निकष असू शकत नाही.प्रत्येक नवीन प्रकल्पासोबत त्या भागातील पुढील २० ते ३० वर्षांतील संभाव्य लोकसंख्या,वाहनसंख्या आणि संसाधनांवरील ताण यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.विकास आराखड्यांमध्ये रस्ते,उद्याने,शाळा, रुग्णालये,पाणीपुरवठा,मलनिस्सारण व्यवस्था आणि सार्वजनिक वाहतूक यांचा समन्वय साधला गेला पाहिजे. अन्यथा आज उभारल्या जाणाऱ्या इमारती उद्या समस्यांचे केंद्र बनू शकतात.याशिवाय पर्यावरणीय संतुलनाचाही विचार करणे आवश्यक आहे.मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बांधकामांमुळे नैसर्गिक जलमार्ग,मोकळ्या जागा आणि हरित क्षेत्र कमी होत आहेत.याचा परिणाम पूरस्थिती,तापमानवाढ आणि पर्यावरणीय असंतुलनाच्या स्वरूपात दिसून येत आहे.त्यामुळे शाश्वत विकासाच्या संकल्पनेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शहरे "स्मार्ट सिटी" बनविण्याची चर्चा केली जाते; परंतु त्यापूर्वी ती "सक्षम सिटी" बनविणे अधिक महत्त्वाचे आहे.नागरिकांना नियमित पाणी,चांगले रस्ते,कार्यक्षम मलनिस्सारण व्यवस्था,सुरक्षित सार्वजनिक वाहतूक आणि जलभरावमुक्त परिसर उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.विकासाचा खरा अर्थ केवळ उंच इमारती किंवा मोठे प्रकल्प नसून नागरिकांचे जीवन अधिक सुसह्य आणि सुरक्षित बनविणे हा आहे.प्रशासन,नगररचना तज्ज्ञ,विकासक आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्रितपणे दीर्घकालीन नगरनियोजनावर भर दिला पाहिजे.लोकसंख्या वाढ आणि नागरी विस्तार यांचा अंदाज घेऊन पायाभूत सुविधांची उभारणी आधी केली गेली,तरच भविष्यातील समस्या टाळता येतील.

अन्यथा आजचा वेगवान विकास उद्याच्या गंभीर नागरी संकटाचे कारण ठरू शकतो.

त्यामुळे विकास आणि पायाभूत सुविधा यांचा समतोल राखणे हीच काळाची खरी गरज आहे.

**– केतन भोज,मुंबई**



## महायुतीचा विधान परिषदेत दणदणीत विजय ; १७ पैकी १६ जागांवर झेंडा, नाशिकमध्ये बंडखोर गोकुळ गीते यांचा धक्कादायक विजय

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीत महायुतीने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. १७ पैकी तब्बल १६ जागांवर महायुती समर्थित उमेदवार विजयी झाल्याने राज्याच्या राजकारणात महायुतीची ताकद अधिक भक्कम झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळवण्यात अपयश आले असून अनेक ठिकाणी पिछेहाट झाली आहे.

१८ जून रोजी पार पडलेल्या या निवडणुकीत १७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले होते. उर्वरित ११ जागांचे निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपने सर्व ११ जागांवर विजय मिळवत शंभर टक्के यशाची नोंद केली. राष्ट्रवादी काँग्रेसने लढविलेल्या दोन्ही जागा जिंकल्या, तर शिवसेनेला चारपैकी तीन जागांवर समाधान मानावे लागले.

निकालानुसार भाजपचे ११, शिवसेनेचे ३, राष्ट्रवादी काँग्रेसचे २ आणि एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. विशेष म्हणजे हा अपक्ष उमेदवार भाजपचा बंडखोर असल्याने नाशिकचा निकाल संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

**नाशिकमध्ये महायुतीलाच महायुतीचा धक्का**

या निवडणुकीतील सर्वात नाट्यमय आणि चक्रावून टाकणारा निकाल नाशिक मतदारसंघात लागला. महायुतीच्या वाटाघाटीत ही जागा शिवसेनेला मिळाल्यानंतर नरेंद्र दराडे यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली होती. मात्र भाजपचे नेते गणेश गीते आणि त्यांचे बंधू गोकुळ गीते यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला.

गणेश गीते यांनी नंतर अर्ज मागे घेतला असला तरी गोकुळ गीते निवडणुकीच्या रिंगणात कायम राहिले. त्यांची उमेदवारी मागे घेण्यासाठी मंत्री गिरीश महाजन आणि उदय सामंत यांनी अनेक फेऱ्यांच्या चर्चा केल्या. प्रचार थांबविल्याची घोषणा करूनही गोकुळ गीते यांनी पडद्यामागील रणनीती सुरू ठेवली आणि अखेर महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव करत धक्कादायक विजय संपादन केला.

निकाल जाहीर होताच गोकुळ गीते समर्थकांनी गुलाल उधळत जल्लोष केला, तर नाशिकमधील हा निकाल महायुतीतील अंतर्गत राजकारणावर नव्याने चर्चा घडवून आणणारा ठरला.

**विजयी उमेदवारांची यादी**

ठाणे – रवींद्र फाटक (शिवसेना) – बिनविरोध

यवतमाळ – दुष्यंत चतुर्वेदी (शिवसेना) – बिनविरोध

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग – अनिकेत तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस) – बिनविरोध

पुणे – विक्रम काकडे (राष्ट्रवादी काँग्रेस) – बिनविरोध

वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर – अरुण लखाणी (भाजप) – बिनविरोध

अहिल्यानगर – प्राजक्त तनपुरे (भाजप) – बिनविरोध

छत्रपती संभाजीनगर-जालना – सुहास शिरसाट (भाजप)

नाशिक – गोकुळ गीते (अपक्ष)

भंडारा-गोंदिया – अविनाश ब्राह्मणकर (भाजप)

सांगली-सातारा – धैर्यशील कदम (भाजप)

परभणी-हिंगोली – सईद खान (शिवसेना)

सोलापूर – राजेंद्र राऊत (भाजप)

धाराशिव-लातूर-बीड – बसवराज पाटील (भाजप)

नागपूर – राजीव पोतदार (भाजप)

जळगाव – नंदकिशोर महाजन (भाजप)

अमरावती – प्रवीण पोटे (भाजप)

नांदेड – अमर राजूरकर (भाजप)

या निकालातून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीची पकड कायम असल्याचे अधोरेखित झाले आहे. भाजपने सर्वच्या सर्व ११ जागा जिंकत संघटनात्मक ताकद दाखवून दिली, तर शिवसेनेला नाशिकमधील पराभवाचा मोठा धक्का बसला. विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा राजकारणाची दिशा काय असू शकते, याचीही चुणूक या निकालातून दिसून आली आहे.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** रविवारी २१ जून रोजी खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये मोठ्या उत्साहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. उपस्थितांना दैनंदिन जीवनशैलीत योग्यभ्यासाच्या सरावाचे फायदे समजावू सांगत योग प्रशिक्षक श्री सत्यपाल चुघ यांनी योगासनांचे प्रात्यक्षिक दाखविले. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये केवळ उपचारांबद्दल नाही तर प्रतिबंध आणि निरोगी जीवनशैलीबाबतही वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. हे योग सत्र याचे एक उदाहरण ठरले आहे. नागरिकांनी निरोगी सवयी अंगीकारण्यास आणि त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेण्यास प्रेरित करणारे असे आणखी उपक्रम हाती घ्यावे असे आमचे ध्येय असल्याची प्रतिक्रिया संदिप जोशी(केंद्र प्रमुख, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबई) यांनी स्पष्ट केले.

# सालेकसा पोलिसांची उत्कृष्ट कारवाई

## अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपींकडून 7,40,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : मा. श्री. गोरख भामरे, पोलीस अधीक्षक, गोंदिया, श्री. अभय डोंगरे, अपर पोलीस अधीक्षक, गोंदिया तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मडामे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध दारू विक्री, साठा व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने दिनांक 21/06/2026 रोजी पोलीस ठाणे सालेकसा हद्दीत मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा गिरोला ते तिरखेडी जाणाऱ्या रोडवर अंदाजे 04 कि.मी. दक्षिणेस संशयित वाहनाची तपासणी करण्यात आली.

तपासणी दरम्यान एक पांढऱ्या रंगाची महिंद्रा बोलेरो वाहन क्र. एम.एच. 28 व्ही 4420 अडवून पंचासमक्ष तपासणी केली



असता वाहनामध्ये रॉकेट देशी दारूच्या 60 पेट्या, प्रत्येकी 100 नग, 90 एम.एल. क्षमतेचे प्लास्टिक पाऊच आढळून आले. एकूण 6000 नग 90 एम.एल. देशी दारूचे पाऊच किंमत 2,40,000/- रुपये तसेच वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले महिंद्रा बोलेरो वाहन किंमत 5,00,000/- रुपये असा एकूण 7,40,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर कारवाईत आरोपी नामे :

संजय सदाशिव राऊत, वय 50 वर्षे

गणेश ईश्वर निकोडे, वय 36 वर्षे

यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी हे कोणताही वैध पास किंवा परवाना नसताना महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे उल्लंघन करून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलीस ठाणे सालेकसा येथे अप. क्र. 311/2026 कलम 65 (अ), 65 (ई), 77 (अ), 77 (ब), 83 महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची उल्लेखनीय कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अभय डोंगरे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, आमगांव प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. बुराडे यांच्या नेतृत्वात पो.हवा. खुशरंग बिसेन, पो.हवा. खांडवाहे, पो.हवा. लांडगे, पो.ना. जांभुळकर, पो.शि. नागदिवे व पो.शि. गौतम यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# आत्मा व शरीराला जोडणारा दुवा म्हणजे 'योग': प्रा. मयुरजी साखळे

## भराडीच्या ज्ञानविकास विद्यालयात योग दिनानिमित्त प्रात्यक्षिके

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर** : "आत्मा आणि शरीर यांना जोडणारा दुवा म्हणजे योग होय," असे प्रतिपादन योग शिक्षक प्रा. मयुरजी साखळे यांनी केले. सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जागतिक योग दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते.

प्रा. साखळे पुढे म्हणाले की, "दोन ते अडीच हजार वर्षांपूर्वी योग ही कला केवळ राजघराण्यांपुरती मर्यादित होती. मात्र, काळाच्या ओघात आजच्या धावपळीच्या युगात शरीर निरोगी आणि मन प्रसन्न ठेवण्यासाठी योगासने अत्यंत आवश्यक आहेत. नियमित योगासनांमुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते, लवचिकता वाढते आणि रोगप्रतिकारक शक्ती बळकट होते.



थोडक्यात, शरीर आणि मन यांचा योग्य समन्वय साधून सुखी आणि संतुलित आयुष्य जगण्यासाठी योगासने अत्यंत महत्त्वाची आहेत."

यावेळी त्यांनी प्रात्यक्षिक स्वरूपात विविध आसने करून दाखवली. यामध्ये उभे राहून करायची आसने (ताडासन, त्रिकोणासन, वृक्षासन), बसून करायची आसने (पद्मासन, वज्रासन, पश्चिमोत्तानासन), पाठीवर झोपून करायची आसने (शवासन, पवनमुक्तासन, सेतूबंधासन), पोटावर झोपून करायची आसने (भुजंगासन, धनुरासन, शलभासन) आणि विपरीत स्थितीतील आसने (शीर्षासन, सर्वांगासन) यांचा समावेश होता.या कार्यक्रमाप्रसंगी ज्ञानविकास विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस व संगीत दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सचिन ठाकूर धामणगाव रेल्वे** : धामणगाव एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित विद्यानिकेतन सीबीएसई स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस व संगीत दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात संगीत शिक्षक सागर ठाकरे यांनी योग आणि संगीत यांचे महत्त्व प्रभावी शब्दांत स्पष्ट केले. संगीत आणि योग या दोन्हीच्या समन्वयाने मन प्रसन्न राहते, ताणतणाव कमी होतो आणि एकाग्रता वाढते, तर योगामुळे शरीर निरोगी राहून लवचिकता आणि मानसिक शांतता प्राप्त होते. योग व संगीत यांचा नियमित सराव केल्यास जीवन अधिक संतुलित, आनंदी व यशस्वी बनते, असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले व योग साधनेचा संदेश देणारे गीत सादर केले. तसेच वाचन प्रेरणादिनाचे औचित्य साधून ग्रंथपाल मधुकर निखार यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमात क्रीडा




शिक्षक वैभव देशमुख यांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे संचालक राजेंद्र जोशी, प्राचार्य बेन्नी सॅम्युअल, उपप्राचार्या साई नीरजा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी पार पडला. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी योग व संगीत यांचे महत्त्व ओळखून ते आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारण्याचा संकल्प केला.

# १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन: नाशिकमध्ये ९५० हून अधिक योगसाधकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार निफाड**

**क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : जिल्हा प्रशासन (नाशिक), जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय (नाशिक), क्रीडा भारती (नाशिक) आणि मराठा विद्या प्रसारक समाजाचे के.टी.एच.एम. कॉलेज (नाशिक) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गंगापूर रोडवरील रावसाहेब थोरात हॉल येथे 'कॉमन योगा प्रोटोकॉल'नुसार सर्व योगसाधकांनी एकत्र येत उत्साहात योगसाधना केली.

**मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटन**

या दिमाखदार कार्यक्रमाचे उद्घाटन मराठा विद्या प्रसारक समाजाचे



सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी क्रीडा भारती नाशिकचे अध्यक्ष श्री. रवींद्र नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुनंदा पाटील, क्रीडा भारतीचे पदाधिकारी श्री. संजय पाटील व श्री. विकास लाटे, तालुका क्रीडा अधिकारी अविनाश टिळे, आणि क्रीडा अधिकारी भाऊसाहेब जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.

तसेच के.टी.एच.एम. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बोरस्ते, आय.क्यू.ए.सी. (IQAC) समन्वयक डॉ. शरद बिन्नर यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, क्रीडा मार्गदर्शक, एन.सी.सी. (NCC) कॅडेट्स, एन.एस.एस. (NSS) चे स्वयंसेवक, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि नागरिक असे जवळपास ९५० हून अधिक योगसाधकांनी या सामूहिक योगसाधनेत सहभाग घेतला.

**'योग' हे उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली: मान्यवरांचे विचार**

"आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या आयोजनामुळे संपूर्ण जगभरात योगाविषयी कमालीची जागरूकता निर्माण झाली आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होत आहे. आज जगातील प्रत्येक देशात लोक स्वयंस्फूर्तीने योग करत आहेत, ज्यामुळे नक्कीच नागरिक आणि राष्ट्राचे आरोग्य सुदृढ राहील."

**- ॲड. नितीन ठाकरे (सरचिटणीस, म.वि.प्र. समाज)**

"आंतरराष्ट्रीय योग दिनामुळे संपूर्ण देशामध्ये एक नवे चैतन्य निर्माण झाले आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात जगभरात जनजागृती घडवून आणली. गतवर्षी देखील 'योग संगम'च्या माध्यमातून १० लाखांपेक्षा जास्त विविध ठिकाणी योगसाधना झाली होती. नियमित योगाभ्यास केल्याने आरोग्य उत्तम राहते, त्यामुळे प्रत्येकाने वर्षभर योग करण्याचा संकल्प करावा."

**- श्री. रवींद्र नाईक (अध्यक्ष, क्रीडा भारती नाशिक)**

# असल्फा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न



**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज);** घाटकोपर पश्चिम असल्फा येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक १५९ मधील १० वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवारी दि २१ रोजी भानुशाली वाडी हॉल,खैराणी रोड, असल्फा या ठिकाणी शिवसाई मित्र मंडळ आणि सामाजिक कार्यकर्ते बाळकृष्ण गटे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. दरम्यान जल्लोष महाराष्ट्राचा या सांस्कृतिक कार्यक्रमाने रंगत आणल्याने मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रभाग क्रमांक १५७ च्या नगरसेविका डॉ. सरिता म्हस्के, सामाजिक कार्यकर्ते नरसीभाई भानुशाली, धरमसीभाई भानुशाली यांसह अनेक मान्यवर,विद्यार्थी, पालक,आणि नागरिक उपस्थित होते.

विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या कार्य कर्तुत्वाचा आणि नेत्र दिपक यशाचा यथोचीत सन्मान करून पुढील यशस्वी आणि उत्तुंग वाटचालीसाठी प्रेरणा आणि स्फूर्ती मिळावी या उद्देशाने गेली एकवीस वर्ष सातत्याने या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे आयोजक बाळकृष्ण गटे यांनी सांगितले.यावर्षी प्रथम श्रेणी आणि विशिष्ट प्राविण्य मिळवलेल्या सुमारे ३५० गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तू आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्या सायन्स अकॅडमी व रोहित कॉमर्स अकॅडमी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.विभागातील विद्यार्थ्यांनी एमपीएससी आणि युपीएससी परीक्षेची प्रेरणा घ्यावी याकरिता या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एक लाख रुपयाचे बक्षीस जाहीर करण्यात आल्याचे आयोजक बाळकृष्ण गटे यांनी यावेळी सांगितले.

# पावसाळी मासेमारी बंदीची कडक अंमलबजावणी आणि सागरी सुरक्षेवर भर !

## उरणच्या करंजा सोसायटीत मच्छिमारांची महत्त्वाची बैठक:

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने मासेमारी धोकादायक ठरते, तसेच हा कालावधी मत्स्य प्रजननाचा असल्याने शासनाकडून दरवर्षी 1 जून ते 31 जुलै या काळात मासेमारीवर बंदी घातली जाते. या बंदीची प्रभावी अंमलबजावणी आणि किनारपट्टीची सुरक्षा यासाठी पोलीस व मत्स्य विभागाकडून संयुक्त प्रयत्न केले जात आहेत.यासाठी पावसाळी मासेमारी बंदी कालावधीच्या पार्श्वभूमीवर उरण व मोरा सागरी पोलीस ठाणे हद्दीतील मच्छिमार सोसायटी अध्यक्ष, पदाधिकारी व मच्छिमार बांधवांची एक महत्त्वाची बैठक आज करंजा मच्छिमार सोसायटीच्या सभागृहात पार पडली. सादर बैठक उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक 22/06/2026 रोजी सकाळी 11:00 ते



12:05 या वेळेत संपन्न झाली.

सदर बैठकीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी, उरण पोलीस ठाणे स्वतः उपस्थित होते. त्यांच्यासोबत सागरी सुरक्षा शाखेचे वपोनिरी संतोष काणे, पोउपनिरी जयराम पाटील, मोरा सागरी पोलीस ठाणे तसेच सहा. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी तथा परवाना अधिकारी सुरेश बावूलगावे, उरण हेही उपस्थित होते. करंजा मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष प्रदिप नाखवा यांच्यासह इतर मच्छिमार सोसायटींचे पदाधिकारी आणि अंदाजे 125 ते 150 मच्छिमार बांधव मोठ्या संख्येने या बैठकीला हजर होते.


सदरच्या बैठकीत उपस्थित मच्छिमार बांधवांना प्रशासनाकडून स्पष्ट सूचना देण्यात आल्या. पावसाळी बंदी कालावधीत खोल समुद्रामध्ये मासेमारीसाठी जाण्यास सक्त मनाई असून, नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला. याशिवाय अवैध धंद्यांसाठी होडी किंवा बोटीचा वापर करू नये, समुद्र व खाडी किनारी भागात सतत सतर्क राहून लक्ष ठेवावे, अशा सूचना करण्यात आल्या. समुद्रमार्गे होणाऱ्या देशविघातक कृत्यांबाबत काही संशयित इसम किंवा बोट निदर्शनास आल्यास तात्काळ कोस्टल हेल्पलाईन क्रं. 1093, डायल क्रं. 112 किंवा उरण पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले तसेच बोटी किंवा होडीवर कामावर ठेवण्यात आलेल्या इसमांची चारित्र्य पडताळणी करून त्याचा अहवाल प्राप्त करून घेणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात आले.

पावसाळा कालावधीत भरकटलेल्या किंवा वाहून आलेल्या बोट, जहाज, टग, बार्जबाबत स्थानिक पोलीस ठाणे, पोर्ट विभाग, कस्टम विभाग, भारतीय तटरक्षक दल, भारतीय नौसेना व नियंत्रण कक्ष, नवी मुंबई यांना कोस्टल हेल्प लाईन 1093 व डायल 112 वर तात्काळ माहिती देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

# जय जवान क्रीडा मैदान कचऱ्याच्या विळख्यात; मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** प्रभाग क्र.१२३ रामनगर ब मायकल डिसोजा चाळीच्या वरील बाजूस डोंगराळ भागात जय जवान क्रीडा मैदान हे परिसरातील मुलांसाठी उपलब्ध असलेले एकमेव मैदान असून,सध्या ते कचऱ्याच्या विळख्यात सापडल्याचे चित्र दिसत आहे.स्थानिक नागरिकांच्या मते,मैदानाच्या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागांतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या वस्ती स्वच्छता योजना आणि डीप क्लिनिंग ड्राईव्ह योजनेची कामे प्रभावीपणे होत नसल्याने येथे मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे.स्थानिक सामाजिक



कार्यकर्ते प्रविण धुमाळ यांचा असा आरोप आहे की,मनपा एन विभाग संबंधित घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे मैदानाचे स्वरूप आता क्रीडांगणा ऐवजी डम्पिंग ग्राऊंडसारखे झाले आहे.



**"एकीकडे मनपा प्रशासनाकडून खेळांना प्रोत्साहन देण्याच्या घोषणा केल्या जातात,तर दुसरीकडे मुलांसाठी उपलब्ध असलेले एकमेव मैदान कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबले जात आहे.अखेर स्थानिक मुलांनी खेळायचे कुठे?" असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**

**- प्रविण धुमाळ,सामाजिक कार्यकर्ते**

मैदानाच्या विविध भागांत कचऱ्याचे ढीग,प्लास्टिक,बांधकामातील अवशेष आणि इतर घनकचरा मोठ्या प्रमाणावर साचला असून खेळाडू आणि नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार,रामनगर आणि आसपासच्या डोंगराळ परिसरात मुलांना खेळण्यासाठी पर्यायी मैदान उपलब्ध नाही.अशा परिस्थितीत या एकमेव मैदानाची ही अवस्था झाल्याने मुलांच्या शारीरिक विकासावर आणि क्रीडा संस्कृतीवर विपरीत परिणाम होत आहे.नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे मैदानाची तात्काळ स्वच्छता करून नियमित डीप क्लिनिंग ड्राइव्ह तसेच वस्ती स्वच्छता योजना मोहीम राबविण्याची मागणी केली आहे

# नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघ विधान परिषद पोटनिवडणूक निकाल जाहीर

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** महाराष्ट्र विधान परिषद निवडणूक 2026 अंतर्गत नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघ पोटनिवडणुकीची मतमोजणी आज घेण्यात आली. यात भाजपाचे राजीव पोतदार यांना ६८२ तर इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या अतुल लोंढे यांना १३० मते मिळाली. एकूण ८१२ मते वैध ठरली तर ११ मते अवैध ठरली. भाजपाचे राजीव पोतदार ५५२ मतांनी विजयी झाले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन सभागृहात सकाळी आठ वाजता निवडणूक निरिक्षक संजय यादव आणि जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या निरीक्षणाखाली मतमोजणीला सुरुवात झाली.

मतमोजणीसाठी एकूण चार टेबल ठेवण्यात आले. अतुल लोंढे यांनाएकूण १३० मते मिळाली. भाजपाचे डॉ. राजीव पोतदार यांना ६८२ मते मिळाली.

## भाजपाचे राजीव पोतदार यांना ६८२ तर काँग्रेसच्या अतुल लोंढे यांना १३० मते




दि. १८ जून रोजी झालेल्या मतदानात १४ मतदान केंद्रांवर ८३६ पैकी ८२३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. नागपूर शहर ११ व उमरेड, कामठी प्रती एक अशा १३ सदस्यांनी मतदान केले नव्हते.

या निवडणुकीत एकूण सुमारे ९८.४४ टक्के मतदान झाले होते

# निरोगी व संतुलित जीवनासाठी योग हा सर्वोत्तम मार्ग - सत्येंद्र चौधरी



**दैनिक युवक आधार**

**सेलू / प्रतिनिधी शिवाजी पवार :** शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद विद्यालयात *आंतरराष्ट्रीय योगदिन (21 जून )* उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात ही भारतमाता प्रतिमा पूजनाने झाली.शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी,अर्थ समितीचे अध्यक्ष सत्येंद्र चौधरी, अनिल कौसडीकर, विनोद मंडलिक यांची उपस्थिती होती.

योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, एकाग्रता वाढते, तणाव कमी होण्यास मदत होते तसेच निरोगी शरीर व प्रसन्न मन होण्यासाठी योग महत्वाचा आहे असे मत सत्येंद्र चौधरी यांनी व्यक्त केले.गजानन साळवे यांनी प्राणायाम, योग यांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चौधरी, आभार काशिनाथ पांचाळ यांनी मानले.

# आदिशक्ती किड्स प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल उमरी येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर** / भारतात अध्यात्मिक प्रक्रियेचा एक विशेष भाग म्हणून योगाला अत्यंत महत्त्व दिलेले आहे. २१ जून हा दिवस संपूर्ण विश्वभरात योग दिवस म्हणून साजरा केला जातो. निरोगी शरीर तसेच स्वस्थ मनासाठी योग अतिशय आवश्यक आहे. दररोज योग केल्याने शरीराला ऊर्जा तसेच मनाला शांती मिळते. सन् २०१५ पासून हा दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर योग दिवस म्हणून साजरा केला जातो.

मानो विकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान संचलित आदिशक्ती किड्स प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल उमरी येथे शाळेतील संचालक मंडळ , शिक्षक वृंद तसेच विद्यार्थ्यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योगा दिवसा निमीत्त एक दिवसीय योग शिबीर घेत योगा दिवस साजरा करण्यात आला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रा. आर.जी.श्रीरामवार सर यांनी विद्यार्थाना योगा






शिकविले योगा व्यायाम केल्याने आपल्याला काय फायदा होतो याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक प्रा.आर.जी.श्रीरामवार सर, टी.जी.माक्रुवार मॅडम , के.सबनेडवार मॅडम, विद्यार्थी व पालक यावेळी उपस्थित होते.

# पाणी चोरी प्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणातून आलेल्या जलवाहिनीला विचुंबे आणि देवगाव हद्दीत एक्सप्रेसवे च्या बाजूला अनधिकृत नळ जोडणी घेऊन मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात कॉंक्रीट मिक्सर चालक, अनोळखी ईसम आणि निया फॅब्रिकेटर्स साई भिंगडे अल्ताफ शेख यांच्या विरोधात 19 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

मोरबे धरण्यातून आलेली जलवाहिनी विचुंबे आणि देवद ग्रामपंचायत गावच्या हद्दीतून जाते. 2025 मध्ये विचुंबे आणि देवद ग्रामपंचायत हद्दीत एक्सप्रेस हायवे लगत मोरबे धरणातून आलेली जलवाहिनीच्या वॉश आऊट वॉलला अज्ञातांनी अनधिकृत नळ जोडणी केली होती. यावेळी ही अनधिकृत नळ जोडणी खंडित करण्यात आली होती. त्यानंतर 2026 मध्ये पुन्हा अनधिकृत जोडणी करण्यात आली आणि मार्च महिन्यात ती पुन्हा खंडित करण्यात आली. त्यानंतर पुन्हा अनधिकृत नळ जोडणी केल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाला मिळाली. यावेळी नळ जोडणी केल्यानंतर त्यावर कॉंक्रीट टाकण्यासाठी कॉंक्रीट मिक्सरच्या गाडीचा वापर केल्याचे दिसून आले आणि अनधिकृत नळजोडणी केल्यापासून तीन लाख 32 हजार घनमीटर पाण्याची चोरी केली. त्याची किंमत 39 लाख 89 हजार रुपये आहे. अनधिकृत नळ जोडणी करून पाण्याची चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# बापूसाहेब लाखनीकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लाखनी येथे जागतिक योग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी :** बापूसाहेब लाखनीकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था लाखनी येथे संस्थेच्या प्राचार्या प्रणाली दहाटे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योग दिन साजरा करण्यात आला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे गटनिदेशक श्री .बंडू राऊत तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून पतंजली समिती लाखनी येथील योगशिक्षक श्री .धनराज तितीरमारे उपस्थित होते .कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी



योगशिक्षक श्री . धनराज तितिरमारे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना प्राणायाम, कपालभारती ,वज्रासन इत्यादी योगासने सांगितली . कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री .बंडू राऊत यांनी आपल्या भाषणात प्रशिक्षणार्थ्यांना आरोग्य सुदृढ आणि मजबूत निरोगी राहण्यासाठी दररोज योगा करण्याचे आव्हाहन केले .तसेच सुदृढ शरीर हीच आपली खरी संपत्ती आहे असे सांगितले . निदेशक चक्रधर पाखमोडे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना योगादिनाविषयक माहिती आणि नियमित योगा करण्याचे फायदे सांगितले .जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमाला बहुसंख्येने प्रशिक्षणार्थी उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन निदेशक चक्रधर पाखमोडे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी शिल्पनिदेशक श्री . दिगंबर उरकुडे ,श्री राजू भुरे ,श्री शुभम सरकाटे, श्री शुभम व्यवहारे, श्री महेश शिंदे ,श्री मोहन रहाटे, श्री नितेश सतदेवे , श्री नागेश बहिरे , ईश्वरी भिवगडे ,श्री प्रशांत वैद्य यांनी सहकार्य केले .

# नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात भाजपाचे अमरनाथ राजुरकर विजयी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी. विश्वदीप कांबळे :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अमरनाथ राजुरकर यांनी दणदणीत विजय मिळवला. त्यांनी 339 मतांच्या आघाडीने प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करत विजयश्री खेचून आणली.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे रविवारी मतमोजणी प्रक्रिया कडेकोट पोलीस बंदोबस्तात, शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अमरनाथ राजुरकर यांना विजयी घोषित केले. त्यानंतर त्यांच्या हस्ते विजयी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी निवडणूक निरीक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे उपस्थित होत्या.

या निवडणुकीत भाजपाचे अमरनाथ राजुरकर, अपक्ष उमेदवार कृष्णा नागेश पाटील आणि प्रशांत विराज इंगोले असे एकूण तीन उमेदवार रिंगणात होते. जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रांवर झालेल्या मतदानात 452 पैकी 451 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

मतमोजणीत एकूण 428 मते वैध ठरली. त्यापैकी अमरनाथ राजुरकर यांना 339 मते, कृष्णा नागेश पाटील यांना 84 मते, तर प्रशांत विराज इंगोले यांना 5 मते मिळाली. तसेच 23 मते अवैध ठरविण्यात आली.

मतमोजणीपूर्वी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मतमोजणी प्रक्रियेसंदर्भात अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. तीन टेबलवर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतमोजणीचे काम पार पाडले.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, उपजिल्हाधिकारी हनुमंत कोळेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, प्रवीण मेगशेट्टी, अनुप पाटील, तहसीलदार संजय वारकड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचारी व संबंधित घटकांचे उपजिल्हाधिकारी राजकुमार माने यांनी आभार मानले.

# राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठ्या पुरवणी मागण्या; १७ हजार कोटींपेक्षा अधिक निधीची अधिवेशनात मांडणी

## शेतकरी कर्जमाफीसाठी २०,५५२ कोटी, मेट्रो प्रकल्पांसाठी ३,३७२ कोटी ; ऊर्जा, रोजगार व सामाजिक योजनांनाही मोठी तरतूद

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / नासिकेत पानसरे :** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारने तब्बल ९७ हजार ७० लाख ६४ हजार ३९ कोटींच्या विक्रमी पुरवणी मागण्या सादर केल्या. राज्याच्या इतिहासातील ही सर्वाधिक रकमेची पुरवणी मागणी मानली जात आहे. गत पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये ५७,५०९.७१ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ४०,५५२ कोटींची महसुली तूट आणि १ लाख ५० हजार ४९१ कोटींची वित्तीय तूट दर्शविण्यात आली होती. त्यानंतर आता सादर झालेल्या या उच्चांकी पुरवणी मागण्यांमधून शेती, पायाभूत सुविधा, ऊर्जा, रोजगार आणि सामाजिक कल्याण योजनांना मोठा निधी देण्यात आला आहे.

अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक संकटांमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने कर्जमाफीसाठी २०,५५२ कोटींची तरतूद केली आहे. या योजनेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' योजनेचे नाव देण्यात आले असून त्यासाठी एकूण ३६,५८५ कोटी खर्च करण्यात येणार आहेत.

केंद्र सरकारच्या भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत विविध विकासकामांसाठी व्याजमुक्त कर्ज म्हणून ९,९३४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेशातील विविध मेट्रो प्रकल्पांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) ३,३७२ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ठाणे-बोरिवली बोगदा प्रकल्प तसेच मुंबईतील पूर्व मुक्तमार्गाजवळील भुयारी मार्ग प्रकल्पासाठी ४५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना कर्जवाटपासाठी ८०० कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळासाठी १,००० कोटींचे भागभांडवल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ऊर्जा क्षेत्रासाठीही मोठी तरतूद करण्यात आली असून महावितरणच्या कर्जावरील व्याजफेडीसाठी ३,००० कोटी, शासकीय कार्यालयांच्या वीजबिलांसाठी ४,००० कोटी आणि महावितरणच्या कर्जफेडीसाठी स्वतंत्रपणे ५,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेतील तूट भरून काढण्यासाठी १,७५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील रोजगार आणि उपजीविकेला चालना देण्यासाठी 'विकसित भारत – रोजगार व आजीविका अभियान (ग्रामीण)' योजनेसाठी ७,३६७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

महिला व बालविकास विभागांतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधन आणि वेतनासाठी १,७३४ कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. तसेच संजय गांधी निराधार, दिव्यांग व इतर लाभार्थी योजनांसाठी ८७४ कोटी ३७ लाख ९८ हजार रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला आहे.

राज्य सरकारच्या या विक्रमी पुरवणी मागण्यांमधून शेतकरी, पायाभूत सुविधा, ऊर्जा, ग्रामीण रोजगार आणि सामाजिक कल्याण योजनांवर विशेष भर देण्यात आल्याचे स्पष्ट होत आहे. आगामी काळात या मागण्यांवर विधिमंडळात सविस्तर चर्चा होऊन त्यास मंजुरी दिली जाणार आहे.

---

## सिंघम रिटर्न्स... आता थेट पारवा पोलिसांचा थरार! ठाणेदार हेमंत चौधरींचा गुन्हेगारांना थेट 'ऑन द स्पॉट' इशारा!

### चित्रपट नाही, तर ही आहे पारवा पोलिसांची रिअल लाईफ ॲक्शन फिल्म!

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : सध्या पारवा पोलिस स्टेशनच्या हद्दीत एकापाठोपाठ एक अशा धडक कारवायांचे सत्र सुरू आहे, आणि या संपूर्ण 'ॲक्शन ड्रामा'चे मुख्य दिग्दर्शक आहेत— ठाणेदार हेमंत चौधरी! एखाद्या डॅशिंग मुव्ही स्टाईलमध्ये त्यांनी गुन्हेगारी जगताचे कंबरडे मोडायला सुरुवात केली आहे. कालपर्यंत जे गुन्हेगार उजळ माथ्याने फिरत होते, त्यांचे धाबे आता ठाणेदारांच्या एकाच नावाने दणाणले आहेत.

केवळ कागदावर आदेश न सोडता, स्वतः मैदानात उतरून चक्रं फिरवणे ही ठाणेदार हेमंत चौधरी यांची अनोखी स्टाईल! नुकतीच किन्ही वन येथे झालेली



४६ हजारांच्या मुद्देमालाची कारवाई ही तर फक्त एक 'झलक' होती. पोलिसांचा ताफा येतो, अचानक वेढा पडतो आणि काही समजायच्या आत आरोपी पोलिसांच्या ताब्यात असतो... हा पारवा पोलिसांचा नवा पॅटर्न सध्या चांगलाच चर्चेत आहे.

ठाणेदारांनी आता एक नवा आणि कडक नियम लागू केला आहे—

गुन्हेगारांची थेट कुंडली आणि ऑन-फील्ड पाहणी!

पारवा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील प्रत्येक रेकॉर्डवरील गुन्हेगारावर आता पोलिसांची 'तिसरी नजर' आहे. कोण कुठे जातोय, काय करतोय, याची खडान् खडा माहिती थेट ठाणेदारांच्या टेबलवर पोहोचत आहे. अवैध धंदेवाले, हातभट्टी चालवणारे आणि कायदा हातात घेणाऱ्यांची आता गय केली जाणार नाही, हा स्पष्ट संदेश या पाहणीतून देण्यात आला आहे.पारवा पोलिसांची ही 'सळसळती शोधमोहीम' दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत चालली आहे. गुन्हेगारांना पळता भुई थोडी झाली असून, सामान्य जनतेतून मात्र पोलिसांच्या या सिंघम स्टाईलचे जोरदार स्वागत होत आहे.थेट इशारा:"अवैध धंदे कराल, तर थेट गजाआड जाल!" पारवा पोलिसांचा हाच कडक आणि डॅशिंग बाणा सध्या संपूर्ण परिसरात गुन्हेगारांचा थरकाप उडवत आहे!

---

## येवदा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे | प्रतिनिधी दर्यापूर** : भारतीय जनता पार्टी पश्चिम मंडळ, दर्यापूर यांच्या वतीने येथील कृषीवाडी परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात योगशिक्षकांनी उपस्थितांना विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचे प्रात्यक्षिक करून नियमित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून दिले.

योगशिक्षक सतीश टोलमारे व प्रकाश तायडे यांनी योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, तणाव कमी होतो तसेच निरोगी जीवनशैली अंगीकारण्यास मदत होते, असे मार्गदर्शन केले. उपस्थितांनी सामूहिक योगाभ्यास करून योगाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प केला. यावेळी भाजप पश्चिम मंडळाचे तालुकाध्यक्ष स्वप्नील गावंडे, संजय वाघमारे, मनोज पाथरकर, नितीन बडे, नुकुल सोनटक्के, संदीप मोटे, प्रेमसागर आररे, कनक सोनटक्के, संतोष मुरकुटे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने






उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या माध्यमातून "योग हीच निरोगी जीवनशैलीची गुरुकिल्ली" हा संदेश देत सर्वांनी नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन करण्यात आले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकरण मतदारसंघात भाजपचे अविनाश ब्राह्मणकर विजयी

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधान परिषद भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया आज जिल्हाधिकारी कार्यालयातील वैनगंगा सभागृह आज सकाळी 8 वाजता सुरू झाली .यावेळी निवडणूक निरीक्षक नितीन पाटील जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी सावन कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पडली. मतमोजणीनंतर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अविनाश ब्राह्मणकर यांनी विजय संपादन केला.



महाराष्ट्र विधान परिषद भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणुकीच्या मतमोजणी प्रक्रियेला जिल्हाधिकारी कार्यालयातील वैनगंगा सभागृह येथे सुरुवात करण्यात आली. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी राजेंद्र कुमार जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मनोहर चव्हाण, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) विकास व्यवहारे, उपजिल्हाधिकारी जे.पी. लोंढे, नायब तहसीलदार (निवडणूक) रोशनी दिघोरे यांच्यासह निवडणूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मतमोजणीअंती भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अविनाश ब्राह्मणकर यांनी 302 मते प्राप्त करून विजय संपादन केला. प्रतिस्पर्धी उमेदवार नरेश ईश्वरकर यांना 154 मते मिळाली, तर सचिन कुंभलकर यांना एकही मत प्राप्त झाले नाही.

एकूण 457 मतांपैकी 1 मत अवैध ठरले असून 456 मते वैध ठरली. मतमोजणीनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी विजयी उमेदवार अविनाश ब्राह्मणकर यांना विजयी प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी निवडणूक निरीक्षक नितीन पाटील तसेच जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सावन कुमार उपस्थित होते.

भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकरण मतदारसंघातील चार मतदान केंद्रांमधून एकूण 457 मतपत्रिका प्राप्त झाल्या. यामध्ये भंडारा केंद्रातून 166, साकोली केंद्रातून 61, गोंदिया केंद्रातून 154 आणि सडक-अर्जुनी केंद्रातून 76 मतपत्रिका प्राप्त झाल्या. त्यापैकी 1 मत अवैध ठरल्यामुळे 456 मतांची मोजणी करण्यात आली.

संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया शांततापूर्ण, सुरळीत व पारदर्शक वातावरणात पार पडल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

---

## जागतिक योग दिनानिमित्त लाखनी न्यायालयात योगसाधनेचा उत्साह

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : माननीय उच्च न्यायालय, मुंबई तसेच माननीय महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, भंडारा यांच्या आदेशान्वये दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तथा तालुका विधी सेवा समिती, लाखनी यांच्या वतीने जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. तालुका अधिवक्ता संघ, लाखनी यांच्या संयुक्त विद्यमाने अधिवक्ता कक्षात आयोजित कार्यक्रमाला मोठ्या संख्येने अधिवक्ता, न्यायालयीन कर्मचारी व अधिकार मित्र उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड .रविभूषण भुसारी होते. यावेळी योग तज्ज्ञ सौ. भांडारकर व सौ. मोहतुरे (पतंजली योग समिती, लाखनी) यांनी



प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना योगाचे महत्त्व पटवून दिले.

योग तज्ज्ञ सौ. भांडारकर यांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाचे अनन्यसाधारण महत्त्व विशद करताना नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य सुदृढ राहते, मन प्रसन्न व सकारात्मक बनते तसेच जीवनशैली अधिक संतुलित होते, असे प्रतिपादन केले. त्यांनी योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून निरोगी आणि आनंदी जीवनाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले.

यानंतर प्रात्यक्षिक सत्रात प्राणायाम, कपालभाती, अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम, भुजंगासन, शवासन आदी विविध योगासने करून दाखविण्यात आली. उपस्थितांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

कार्यक्रमास एड. रोकडे, ॲड. येळेकर, योग तज्ज्ञ सौ. भांडारकर, सौ. मोहतुरे, दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, लाखनी येथील सहायक अधीक्षक व कर्मचारी तसेच पी.एल.व्ही. (अधिकार मित्र) मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी भिवगडे (पी.एल.व्ही.) यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. एम. एन. नंदनवार, कनिष्ठ लिपिक, तालुका विधी सेवा समिती, लाखनी यांनी केले.

योगाच्या माध्यमातून निरोगी समाज घडविण्याचा संदेश देत लाखनी न्यायालय परिसरात जागतिक योग दिन उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा झाला.

---

## वर्धिष्णु एज्युकेशन सोसायटी संचलित आरंभ पब्लिक स्कूलमध्ये 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा!

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : नाशिक येथील वर्धिष्णु एज्युकेशन सोसायटी संचलित आरंभ पब्लिक स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदमयी वातावरणात साजरा करण्यात आला. लहानपणापासूनच बालकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती व्हावी आणि त्यांना योगाची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शाळेच्या संचालिका अस्मिता मोगल यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्री-स्कूलमधील ३ ते ६ वर्षे वयोगटातील चिमुकल्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग घेतला.

**चिमुकल्यांनी सादर केली अवघड आसने**

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, नियमित योगाभ्यासामुळे होणारे शारीरिक व मानसिक फायदे तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व अगदी सोप्या आणि रंजक भाषेत समजावून सांगितले. केवळ ३ ते ६ वर्षे वयोगटातील या चिमुकल्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने वृक्षासन, वज्रासन, भुजंगासन आणि बालासन यांसारखी विविध योगासने अचूकपणे सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यासोबतच, सामूहिक 'ॐ' कार पठण करून विद्यार्थ्यांनी योगाचे आध्यात्मिक आणि मानसिक महत्त्वही अनुभवले. संपूर्ण परिसर या पठणाने मंत्रमुग्ध झाला होता.

**शिक्षकांचे विशेष सहकार्य**

हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका सुचिता गीते, मंजिरी चौधरी, रसिका गायकवाड आणि शारदा सूर्यवंशी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांकडून योगासनांचा सराव करून घेणे आणि कार्यक्रमाचे नेटके नियोजन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला.

लहान वयातच मुलांवर आरोग्याचे आणि सुदृढतेचे संस्कार करणाऱ्या या उपक्रमाचे पालकांकडून आणि नाशिकमधील शैक्षणिक वर्तुळातून भरभरून कौतुक होत आहे

---

## सारोळा येथील जिल्हा परिषद शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा....!

### श्री शंभूसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्था जामखेड यांच्या वतीने योगासनाचे धडे देण्यात आले...!

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी | बापुसाहेब घोडेस्वार :** दि २१ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी श्री शंभूसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रशिक्षक संतोष उर्फ बबलू (वस्ताद ) टेकाळे तसेच त्यांचे मल्लखांब क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय खेळाडू रितेश खुपसे ,विभागपातळीवर मल्लखांब मध्ये प्राविण्य संपादन केलेली मल्लखांब खेळाडू अंकिता जाधव व जिल्हा पातळीवर यश संपादित केलेली मल्लखांब खेळाडू श्रेया करडकर या सर्वांच्या वतीने सूक्ष्म व्यायाम,शारीरिक हालचाली,प्राणायाम,योगासने,सूर्यनमस्कार व योगनिद्रा या प्रकाराचे जि. प.प्राथमिक शाळा सारोळा येथील विद्यार्थ्यांना योगाचे धडे देण्यात आले.तसेच अवघड असे योग प्रात्यक्षिके देखील सादर करण्यात आले .सदर प्रात्यक्षिक मध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व पालक यांनी सहभाग नोंदविला.तसेच आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व व योगासनाचे फायदे याविषयक माहिती विद्यार्थ्यांना यावेळी आलेले योगशिक्षक संतोष उर्फ बबलू (वस्ताद) टेकाळे व शाळेतील शिक्षकांनी करून दिली उत्कृष्टरित्या योगासनाचे प्रात्यक्षिक सादर केल्याबद्दल श्री शंभूसूर्य मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्थेच्या संपूर्ण टीमचा सारोळा शाळेच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी श्री शंभूसूर्य मर्दानी खेळ, योग व मल्लखांब प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्य प्रशिक्षक,योगशिक्षक संतोष उर्फ बबलू (वस्ताद ) टेकाळे तसेच मल्लखांब क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय मल्लखांब खेळाडू रितेश खुपसे,विभागपातळीवर मल्लखांब मध्ये प्राविण्य संपादन केलेली मल्लखांब खेळाडू अंकिता जाधव व जिल्हा पातळीवर यश संपादित केलेली मल्लखांब खेळाडू श्रेया करडकर,पालक मदन मुळे,शाळा व्यवस्थापन समिती माजी उपाध्यक्ष देविदास पवार,शाळेचे मुख्याध्यापक संदिप भालसिंग ,पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे सर ,राहुल लिमकर , उपाध्यापक श्री.प्रशांत होळकर,उपाध्यापिका शबाना शेख ,वृषाली खांदवे व अमृता रसाळ व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



